अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ४ जून २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २४५ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## सोलापूर-पुणे महामार्गावर तीन गाड्यांचा अपघात दोघांचा मृत्यू; चौघे जखमी



✔ **सोलापूर** : पाकणीहून सोलापूरच्या दिशेने दोन कार आणि एका दुचाकीच्या झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी सायंकाळी सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर घडला. एका कारचे टायर फुटल्याने चालकाचा कारवरील ताबा सुटला. चालकाने समोरून दुचाकीवर येणाऱ्या शिवयोगी हांडे व भैरम्मा शिवयोगी हांडे (वय-४५, रा.कुमार स्वामी नगर,शेळगी) यांना धडक दिली. त्याचवेळी कारला पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या कारची धडक बसली. यात कार पलटी होऊन दुभाजकात जाऊन अडकली. या अपघातात भैरम्मा हांडे यांचा व कारमधील विहान मयूर कांगडे (वय-१४,रा.मुंबई) यांचा मृत्यू झाला. तर बबलू कांगडे, मारूती बागडे, मयूर कांगडे, रतन कांगडे हे जखमी झाले आहेत.

## ऋतुराज गायकवाडची नवीन इनिंग, उत्कर्षा पवारसोबत लाईफ पार्टनरशीप सुरू



✔ **सोलापूर** : भारताचा युवा क्रिकेटपटू आणि चेन्नई सुपर किंग्सचा स्टार प्लेअर मराठमोळा ऋतुराज गायकवाड आज लग्नबंधनात अडकला. ऋतुराज गायकवाड आणि उत्कर्षा पवार यांचा महाबळेश्वरमध्ये विवाहसोहळा आज पार पडला आहे. नुकतेच त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले जात आहेत आणि चाहत्यांनी त्यांना भरघोस शुभेच्छा दिल्या आहेत. आयपीएल २०२३ च्या विजयानंतर मैदानावर ऋतुराज उत्कर्षा पवारसोबत फिरताना दिसला होता. मध्यंतरी त्या दोघांचा धोनी सोबतचा फोटो देखील व्हायरल झाला होता. दरम्यान त्याने लग्नाची घोषणा केली होती. ऋतुराजची बायको उत्कर्षा पवार ही देखील एक क्रिकेटपटू आहे.

# थुंका-थुंकीचे राजकारण भडकले, शिंदे गटाने राऊतांना दिले टोले

## 'संज्या ओढतो गांजा'ची घोषणाबाजी, महिलांनी बॅनरवर थुंकले, चपलीने मारले...

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्रात थुंका-थुंकीचे राजकारण चांगलेच भडकले आहे. नेत्यांची वैचारिक पातळी घसरत चालली आहे. आपण काय बोलतो काय नाही? याचे साधे ताळतंत्रही राहिलेले नाही. ठाकरे गटातील शिवसेनेचे खा. संजय राऊत यांच्या 'त्या' थुंकण्याच्या कृतीवर शिंदे गटातील कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. सर्वत्र राऊतांचा निषेध होतो आहे. शिवाय शिंदे गटाकडून मोर्चे काढले जात आहेत. 'संज्या ओढतो गांजा', अशी घोषणाबाजी करत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी राऊतांच्या बॅनरवर थुंकी टाकत शनिवारी पुण्यात मोर्चा काढला तर महिला कार्यकर्त्यांनी राऊतांच्या पोस्टरला जोडेही मारले. ठाकरे गट आणि शिंदे गट या प्रकरणावरून पुन्हा एकमेकांच्या छाताडावर बसणार, असे दिसते. दरम्यान याप्रकरणी राष्ट्रवादी नेते व विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी खा. राऊत यांना कडे बोल सुनावताच खा. राऊत यांनी मागे एकदा झालेले 'ते' प्रकरण उकरुन काढीत राष्ट्रवादीचे नेते व विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यावर निशाणा साधल्याने राष्ट्रवादीच्या गोटात संतापाची लाट उसळली आहे.





**तीव्र पडसाद उमटणार...**



चंद्रपूरच्या दौऱ्यावर असलेले यांनी याप्रकरणी अजितदादा यांनी राऊतांना सडेतोड उत्तर दिले. नेत्यांनी, प्रवक्त्यांनी, कार्यकर्त्यांनी आपली महाराष्ट्र संस्कृती आहे, परंपरा आहे, आपला काही इतिहास आहे, ती जपली पाहिजे. आपल्या सर्वांना स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सुसंकृत महाराष्ट्र कसा असू शकतो आणि कसा काम करू शकतो. ते देशाला दाखवून दिलेले आहे. त्यामुळे प्रत्येकाने तारतम्य ठेवून वागावे एवढीच माझी भूमिका आहे,असे अजितदादा म्हणाले. त्यावर बोलताना राऊत यांनी जीभ चक्क घसरली. धरणामध्ये XXX पेक्षा थुंकणे चांगले. ज्याचे जळते त्याला कळते, अशा शब्दात राऊतांनी अजितदादांना प्रतिउत्तर दिले. राऊतांच्या या विधानाने राष्ट्रवादीत तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे.





**बेईमानांची नावे घेतल्यावर थुंकलो**

राऊतांना थुंकल्याबद्दल माफी मागणार का? असे विचारले असता ते म्हणाले की, रोज १३० कोटी जनतेला माफी मागावी लागेल. कारण रोज कोणी ना कोणी थुंकत असतो. मी सार्वजनिक ठिकाणी थुंकलो नाही, राजकीय नेत्यांवर थुंकलो नाही, बेईमानांची नावे घेतल्यावर थुंकलो. हा फरक आहे. ज्यांनी महाराष्ट्र, शिवसेना, ठाकरे कुटुंब आणि बाळासाहेब ठाकरेंसोबत बेईमानी केली, त्यांचे नाव समोर आल्यावर माझी जीभ चावली गेली आणि त्यातून ही कृती झाली.

**ही तर हिंदू संस्कृती...** : वीर सावरकरांना एकदा कोर्टात आणले गेले. तेव्हा त्यांनी त्यांची माहिती देणारा बेईमान कोपऱ्यात उभा असल्याचे पाहिले आणि त्याच्याकडे बघून वीर सावरकर थुंकले होते. त्यामुळे बेईमान्यांवर थुंकणे ही हिंदू संस्कृती, हिंदुत्वाचा एक भाग आहे. मी कुणावरही थुंकलो नाही. पण वीर सावरकरांनीही बेईमान्यांवर थुंकणे ही संस्कृती असल्याचे दाखवून दिले होते. इतिहासात त्याची नोंद आहे, असा एक किस्सा सांगत राऊत यांनी मी वीर सावरकरांचा भक्त असल्याचे सांगितले.

**लोकच जोडे मारतील...** : राऊत सध्या त्र्यंबकेश्वर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांना शिंदे गटाकडून राज्यभर होणाऱ्या 'जोडे मारो' आंदोलनाकडे कशापद्धतीने बघता असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, कशाकरता बघायचे. त्यांना ना काम ना धंदा, ना कार्यकर्ते. कशाकरता जोडे मारत आहेत काय माहिती? लोकांनी त्यांना वर्षभरामध्ये इतके जोडे मारलेत आणि लोक निवडणुकीची वाट बघत आहेत त्यांना जोडे मारण्यासाठी. त्यांचा जो काही टाईमपास चालला आहे तो चालू दे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यासंदर्भात प्रश्न विचारताच ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी (२ जून रोजी) ऑन कॅमेरा थुंकले होते. त्यामुळे शिंदे गट विरुद्ध ठाकरे गट वाद पुन्हा पेटला आहे. पुण्यातील गुडलक चौकात शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार मोर्चाच काढला. शिंदे गटाचे कार्यकर्ते हातात राऊतांचे बॅनर घेऊन चौकात उतरले होते. त्यावर राऊतांचा फोटो लावलेला होता. गाढव व रेड्याच्या फोटोवर राऊतांचा चेहरा लावून शिंदे गटाचे कार्यकर्ते त्यावर थुंकले. काही बॅनर्सवर 'संज्या ओढतो गांजा', अशी वाक्ये लिहिली होती तर महिला कार्यकर्त्यांनी राऊतांच्या फोटोवर चपलांचा प्रसाद दिला.

**आम्ही कुणाचंही नाव घेतल्यावर थुंकत नाही : आव्हाड**



प्रत्येकाची एक स्टाईल असते, ते त्यांच्या त्यांच्या स्टाईल प्रमाणे बोलत असतात. आमच्यावर शरद पवार यांचे संस्कार आहेत. आम्ही कुणाचंही नाव घेतल्यावर थुंकत नाही. आम्हाला शरद पवार यांची भीती आहे', असं म्हणत आ. जितेंद्र आव्हाड यांनी एक प्रकारे संजय राऊत यांना टोला लगावला. राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड शनिवारी तुळजापूरला जाताना काही वेळ सोलापूरला विश्रांती केली. यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

---

**७१ लाख रुपयांचा अपहार**

## साडेच्या तत्कालीन महिला सरपंच, ग्रामसेवकाविरुद्ध गुन्हा

✔ सुराज्य/करमाळा

चौदाव्या वित्त आयोगातून साडे ग्रामपंचायत विकास कामासाठी प्राप्त निधीतून ७१ लाख ४२ हजार ८४८ रुपयाचा अपहार करून शासनाची फसवणूक केल्याप्रमाणे साडे ग्रामपंचायत तत्कालीन महिला सरपंच जयाबाई दत्तात्रय जाधव आणि ग्रामसेवक राजेश सौदागर फडतरे (रा. कव्हे ता.माढा ) या दोघांविरुद्ध करमाळा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नुकताच दाखल केला आहे.

या संदर्भात पंचायत समितीचे विस्तार अधिकारी मनोज कुमार देविदास म्हेत्रे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. साडे ग्रामपंचायत विकास कामासाठी शासनाच्या चौदाव्या वित्त आयोगातून ९६ लाख ७५ हजार ९५० रुपयाचा निधी मंजूर झाला होता. तत्कालीन सरपंच आणि ग्रामसेवक या दोघांनी ऑक्टोबर २०१५ ते एप्रिल २020 या कालावधीत या रकमेचा अपहार केला.शासकिय अभिलेखा तपासणी हा प्रकार उघडकीस आला.असे विस्तार अधिकारी म्हेत्रे यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## जुळे सोलापुरात वृद्धाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : जुळे सोलापुरातील कल्याण नगरात राहणाऱ्या एका ७३ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. गुरुनाथ काशिनाथ देशमुख (वय ७३ रा. कल्याण नगर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे.

घरातील हॉलमधील छताच्या पंख्याला वायरच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून सिद्धाराम चौगुले (पुतण्या) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

▶ **पोचमपाड कंपनीचा अजब कारभार**

## जॅकवेलच्या कामासाठी उजनी धरणात उडवले ब्लास्टिंग

### पाटबंधारे विभागाने कंपनीचे काम थांबवले

✔ सुराज्य/सोलापूर

समांतर जलवाहिनीचे काम हाती घेतलेल्या पोचमपाड कंपनीने सुरुवातीलाच अजब कारभार केला. जॅकवेलच्या कामासाठी धरणामध्ये ब्लास्टिंग उडवले. यामुळे उजनी धरणास धोका होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

समांतर जलवाहिनीच्या कामाची वर्कऑर्डर मिळाल्यानंतर पोचमपाड कंपनीने काम सुरू केले आहे. मात्र पावसाळ्यात जॅकवेलचे काम करता येणार नाही म्हणून हे काम लवकर उरकण्यासाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी चक्क उजनी धरण क्षेत्रात ब्लास्टिंग उडवले. उजनी धरण क्षेत्रात ब्लास्टिंग उडवण्यास मनाई आहे. ब्लास्टिंग उडवल्यामुळे धरणाच्या बंधाऱ्याला तरी जाऊन धरण फुटण्याची भीती असते. याची माहिती असताना देखील कर्मचाऱ्यांनी जॅकवेलच्या कामासाठी चक्क ब्लास्टिंग केले. याबाबतची माहिती पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांना मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ उजनी धरण परिसराला भेट दिली. त्यांनी पोचमपाड कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कान उघडणी केली आणि काम देखील थांबवले आहे.

---

## तळेहिप्परगा येथे डंपरची दुचाकीला धडक; २ महिला ठार

✔ सुराज्य/सोलापूर

शुक्रवारी झालेल्या आपल्या मुलीच्या लग्न सोहळा झाल्यानंतर आज मुलाकडील कडील जेवण आटोपून दुचाकीवरून ट्रिपल घराकडे जात असताना पाठीमागून डंपर धडकल्याने मुलीची आई आणि आईची आत्या असे दोघेजण जागीच ठार तर वडील जखमी झाले. हा अपघात सोलापूर ते तुळजापूर रोडवरील तळेहिप्परगा येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

शरीफा असिफ शेख (वय ३५ रा.तळेहिप्परगा सोलापूर) त्यांची आत्या सलीमा बशीर चौधरी (वय ५० रा . गणेशहिंगणी जि. पुणे) असे मयत झालेल्या महिलांची नावे आहेत. तर मयत शरीफा शेख यांचे पती आसिफ शेख (वय ४० रा. तळे हिप्परगा) हे जखमी झाले. या अपघाता संबंधी मिळालेली माहिती अशी आसिफ शेख यांच्या मुलीचा विवाह शुक्रवारी झाला होता. शनिवारी शहरातील मोदी (हुडको) परिसरात मुलाकडचे जेवण आटोपून तिघे दुचाकीवरून तळेहिप्परगा येथे आपल्या घराकडे निघाले होते. सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास तळेहिप्परगा येतील फूट रस्त्याजवळ पाठीमागून खडी वाहतूक करणारा एमएच१३-डीक्यू- ५०५८ या क्रमांकाचा डंपर धडकल्याने दोघेजणी चाकाखाली सापडून जागीच मयत झाल्या. तर आसिफ शेख हे जखमी झाले. या अपघाताची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली पुढील तपास फौजदार ताकभाते करीत आहेत. मयत महिलांचे फोटो आहे. लालसाडी वाली ही लग्न झालेल्या मुलीची मुलीची आई आहे.



शरीफा शेख



सलीमा चौधरी

मयत झालेल्या शरिफा शेख यांच्या पश्चात पती आणि २ लहान मुले असा परिवार आहे. त्यांचे पती आसिफ शेख हे सेंट्रीगचे कामे करतात. शेख दांपत्याच्या एकुलत्या एक मुलीचा विवाह शुक्रवारी झाला होता, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## दुचाकी घसरल्याने जखमी इसमाचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

घराकडे जात असताना दुचाकी घसरल्याने ३८ वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी सायंकाळी मयत झाले.हा अपघात शुक्रवारी रात्री धाराशिव येथे घडला होता . नितीन बाबूराव कांबळे (वय ३८ राहणार जहागीरदारवाडी, धाराशिव) असे मयताचे नाव आहे. ते शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घराकडे निघाले होते . ग्रामीण पोलीस स्टेशन जवळ दुचाकी घसरल्याने ते जखमी झाले होते. त्यांना धाराशिव येथे उपचार करून उमा (पत्नी) यांनी सोलापुरात दाखल केले होते. उपचारादरम्यान ते मयत झाले. याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून पालखीतळ, पालखी मार्गाची पाहणी

✔ सुराज्य/सोलापूर

संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आणि अन्य संतांच्या पालखी सोहळ्यासोबत आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालखी तळ व मार्गावरील तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशा सूचना प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दिल्या.

संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या तयारीसाठी सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गाची व विविध पालखी तळांची पाहणी ठोंबरे यांनी शनिवारी केली. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सुशील बेल्हेकर, अमरदीप वाकडे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, विनायक गुळवे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, उपकार्यकारी अभियंता ज्योती इंगवले तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्ह्यात रिंगण सोहळा या सोहळ्यास मोठ्या प्रमाणात गर्दी होते या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करावे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी तळाशेजारची अपुरी असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. पालखी सोहळ्याच्या प्रताप परंपरेचे जतन करण्यासाठी सोहळा प्रमुखांनी सुचवलेली कामे प्राधान्याने करावीत, अशा सूचनाही ठोंबरे यांनी दिल्या.


**६५ एकरासह नदी पात्राचीही केली पाहणी**

माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी, नातेपुते, माळशिरस, तोंडले बोंडले, बोरगाव, माळीनगर तसेच पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली भंडीशेगांव, वाखरी पालखीतळ, रिंगण सोहळ्याची ठिकाणी तसेच ६५ एकर व नदी पात्राची ठोंबरे यांनी पाहणी करून आवश्यक त्या सूचना संबंधितांना यावेळी दिल्या.

---

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे





आता कशाचाच भरोसा राहिला नाही !

कल्याण
346-32-138

**मुंबईत काँग्रेसची आढावा बैठक**

## सोलापूर लोकसभेचे सर्वाधिकार शिंदेंकडेच राहणार

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघाचा आढावा बैठका सुरू आहेत. शनिवारी सोलापूर लोकसभा संदर्भात बैठक झाली. यात या मतदारसंघाचे सर्व अधिकारी माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे देण्याचे एकमताने ठरले.



मुंबईतील टिळक भवन येथे झालेल्या आढावा बैठकीला प्रदेश अध्यक्ष नाना पटोले माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्षा आ. प्रणिती शिंदे, चिटणीस आशिष दुआ, सोनल पटेल, नसीम खान, कुणाल पाटील, मोहन जोशी, उल्हास पवार आदी उपस्थित होते. या बैठकीत सोलापूर लोकसभा निवडणूक २०२४ संदर्भात सर्व अधिकार सुशीलकुमार शिंदे यांना देण्याचा ठराव एकमताने सोलापूर शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी मांडला. त्यास सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी अनुमोदन दिले. यावेळी माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, विश्वनाथ चाकोते, धनाजी साठे, रामहरी रूपनवर, बाबा मिस्त्री, नगरसेवक रियाज हुंडेकरी, विनोद भोसले, अंबादास करगुळे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शहर अध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले, मोदी लाट आणि जातीपातीचे समीकरणामुळे, पुलवामा हल्ला यामुळे सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचा पराभव झाला. पण भाजपचा आणि खासदारांच्या बाबतीत लोकांचा भ्रमनिरास झाला असून भाजप आमदारांच्या अपयशी कारभार, महानगरपालिकेतील भाजपचा भोंगळ कारभार यामुळे आत्ता जनतेला कळून चुकले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीत सोलापुरातून काँग्रेसचा विजय निश्चित आहे.

**काँग्रेसची संघटना मजबूत करा : पटोले**

काँग्रेसचे वातावरण चांगले आहे म्हणून गाफिल न राहता काँग्रेसचे संघटना मजबूत करा, लवकरच लोकसभा निवडणूक लागणार आहेत त्यासाठी तयारीला लागा. प्रत्येक लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या विचारांची माणसे आहे. सर्व समाजाला घेऊन जनतेची कामें करा. संघटना मजबूत असेल तर आपल्याला कोणीही हरवू शकणार नाही, असे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

**सर्वाधिक खासदारांसाठी प्रयत्न करू: आ. शिंदे**

सुशीलकुमार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहर जिल्ह्याची संघटना खंबीर आहे, आज सर्व पदाधिकाऱ्यांनी सोलापूर लोकसभा निवडणूक संदर्भात एकदिलाने शिंदे साहेबांकडे सर्व अधिकार देण्याचा ठराव मांडला. काहीतरी नवीन कांड करून निवडणूक जिंकण्याची भाजपची पद्धत आहे. आपण सर्वजण अतिआत्मविश्वासात न राहता काँग्रेसचे सर्वाधिक खासदार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करू, असे आ. प्रणिती शिंदे म्हणाल्या.



# सोलापूर लोकसभा उमेदवारी शिंदे तर माढा धवलसिंहांना द्या

✔ सुराज्य/सोलापूर

## जिल्हा काँग्रेसच्या वतीने मागणी

सोलापूर लोकसभेची उमेदवारी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे किंवा प्रदेश काँग्रेसच्या कार्याध्यक्ष आमदार प्रणितीताई शिंदे यांना देण्यात यावी तसेच माढा लोकसभा मतदार संघाची उमेदवारी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ धवलसिंह मोहिते पाटील यांना देण्यात यावी अशी मागणी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्याकडे प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष सुधीर लांडे यांनी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने केली. मुंबई येथे काँग्रेसच्यावतीने लोकसभानिहाय आढावा बैठक सुरू आहे.

यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यासह माजी मंत्री आरिफ नसीम खान सोलापूर मध्य आमदार प्रणितीताई शिंदे त्यांच्याकडेही निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, जिल्हा संघटक रमेश हसापुरे, प्रदेश काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राशिद शेख अल्पसंख्यांक विभाग जिल्हाध्यक्ष वसीम पठाण, जिल्हा काँग्रेस सरचिटणीस भीमराव बाळगे, माढा अध्यक्ष ऋषिकेश बोबडे, प्रतापराव जगताप, अभिषेक कांबळे, माळशिरस सतीश पालकर, हणमंत मोरे, माण खटाव तालुक्याचे पदाधिकारी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सांगोला येथे संजय राऊत यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन

✔ सुराज्य/सांगोला

शिवसेना शिंदे गटाचे खा. श्रीकांत शिंदे यांचे नाव घेताच खा संजय राऊत हे थुंकले व प्रसारमाध्यमांबाबत बेताल वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ सांगोला तालुका शिवसेना, युवा सेना, शिवसेना आमदार शहाजी बापू पाटील विचार मंच यांच्यावतीने काल सांगोला येथील वासूद चौकात खा. संजय राऊत यांच्या प्रतिमात्मक पुतळ्याला जोडे मार आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी शिवसैनिकांनी 'अरे या संजय रावताचे करायचे काय खाली मुंडके वर पाय.. धिक्कार... असो धिक्कार... असो संजय रावताचा धिक्कार असो अशा घोषणा देऊन संजय राऊत यांचा निषेध व्यक्त केला.



यावेळी माजी नगरसेवक सोमेश यावलकर शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे युवा सेना तालुकाप्रमुख गुंडा दादा खटकाळे, उद्योगपती अभिजीत नलवडे, संजय मेटकरी, बाळासाहेब आसबे,माजी पंचायत समिती सदस्य सुभाष इंगोले, पांडुरंग मिसाळ, अजिंक्य शिंदे, संजय गव्हाणे, धीरज पवार, सचिन काळे, पप्पू इंगोले, दीपक दिघे ,दीपक पवार ,आदित्य नागणे ,अजय सुरवसे ,अक्षय पवार यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे म्हणाले, संजय राऊत यांच्या मेंदूला पॅरालिसचा आजार झालाय त्यामुळे त्याच्यावर लवकर उपचार करणे गरजेचे आहे. ठाकरे यांनी त्यांना आवरावे. नाही तर सांगोला तालुक्यातील शिवसैनिकाच्या स्वाधीन करा आम्ही उपचार करू व भविष्यात अशी बेताल वक्तव्य करणार नाही याची काळजी घेऊ

# कुचन प्रशालेचा निकाल ८४.८३ टक्के

✔ सुराज्य/सोलापूर

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल ८४.८३ टक्के लागला आहे .२७७ विद्यार्थी परीक्षेत बसले . त्यापैकी २७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, ७९ विद्यार्थी प्रथम श्रेणी , ७९ विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर ५० विद्यार्थी पास श्रेणी असे एकूण २३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ऋतुराज सुपेकर यांने ८८.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर अनुष नारकर, मयुरेश चिंचुरे ८४.८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक विभागून पटकावला



तर मधुसूदन चरकुपल्ली याने ८४.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

तेलुगु माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला आहे. तेलुगु माध्यमातून बोल्लू रचना रघू हिने ८५.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला कु. इंजेटी अर्पिता सुवर्णराजू हिने ८२ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तरदंडगळ नवीन नरसप्पा ७९.४० टक्के गुण मिळवून तृतीय कमांक पटकावला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ गड्डम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी , सचिव दशरथ गोप ,सहसचिवा संगीताताई इंदापूरे , खजिनदार नागनाथ गंजी ,शालेय समितीचे अध्यक्ष श्रीधर चिट्याल व सर्व विश्वस्तांनी अभिनंदन केले.

प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर , उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले ,पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे तसेच इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक बसवराज हिटनळ्ळी ,राहुल ताटे, अश्विनी मैसूर , श्रीनिवास चेरमन ,निर्मला शिंदे , शरद पोतदार ,बाळासाहेब गंभीरे व प्रतिभा इराबत्ती व सर्व विषय शिक्षकांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# सुशील मराठी विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

✔ सुराज्य/सोलापूर

पुणे मंडळाकडून घेण्यात आलेल्या सन २०२३-२३ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षामध्ये सुशील मराठी विद्यालयाचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून मुलींनी बाजी मारली आहे.

कु. वाघमारे उर्मिला लक्ष्मण हिने ९१.८०% प्रथम कु. काळे मयुरी गिरमल हिने ८५.६०% द्वितीय कु. जाधव साक्षी ज्ञानेश्वर हिने ८५.२०% तृतीय असे अनुक्रमे गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल करबसू जाधव, सचिव सोमनाथ गायकवाड, व्यवस्थापक काशिनाथ जाधव, मुख्याध्यापक उमाकांत काळे व शिक्षक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. क्रमांक पटकावलेल्या मुलींचा विद्यालयांकडून सत्कार करण्यात आला.


# सलगर येथे आजपासून यात्रा प्रारंभ

# जय हनुमान यात्रा महोत्सवानिमित्त कार्यक्रम

✔ सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील सलगर येथे सालाबादाप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्री जय हनुमान कारुणी यात्रा- महोत्सव निमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त रविवार,दि.४ जून रोजी व्हन्नुगी, पहाटे जय हनुमान मुर्तीस महारुद्राभिषेक, सकाळी कळसारोहण, दुपारी पालखी उत्सव, नंदीध्वज, कुंभ, मिणीदोरसहीत पालखी व रथोत्सव कार्यक्रम सायं.७ वाजेपर्यंत भव्य मिरवणूक परमपूज्य इरसंगय्या शांतय्या महास्वामीजी ( शिवबसव विरक्तमठ सलगर ) यांच्या दिव्य सानिध्यात शोभेचे दारुकाम व रथोत्सव कार्यक्रम संपन्न होईल व रात्रौ १० वाजता श्री जय हनुमान पारिजात भजना मंडळ व



श्री महादेव भजना मंडळ,सलगर यांचा भजन कार्यक्रम होणार आहे.

सोमवार ( दि.५ ) कारुणी यात्रा महोत्सव पहाटे ३ ते सकाळी ७ पर्यंत दंडवत व सकाळी ७ ते दुपारी १२ पर्यंत बैलांचे मिरवणूक, मंदिर परिसरात दुपारी १२ ते सायंकाळी ६ :०० पर्यंत कारुणी बैल गाड्यांचे पळविण्याचा भव्य कार्यक्रम होणार आहे.रात्री ९:३० वा. श्री दुर्गादेवी गायन संघ नागेशी चौडकी मेळ रा.बिसनाळ ता.बिळगी जि.बागलकोट व हालसिध्देश्वर चौडकी गायन संघ रा.कंकणवाडी ता.रायबाग जि बेळगांव इवर चौडकी पदा कार्यक्रम

मंगळवार ( दि. ६ ) रोजी दिवसभर श्री अक्कमहादेवी भजना मंडळ, महाऐनापूर ( जि.विजयपूर ) व श्री यल्लालिंगेश्वर भजन मंडळ ( कडणी ता. सिंदगी जि.विजयपूर ) यांचे सुंदर भजन कार्यक्रम होईल.परगावहून आलेल्या भक्तगणांना पिण्याच्या पाण्याची व महाप्रसादची सोय केलेली आहे.

तरी सर्व सदभक्तांनी यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन श्री जय हनुमान कारुणी यात्रा पंचकमिटी केले आहे.

तालुक्यातील सलगर येथे श्री जय हनुमान कारहुणवी यात्रेला अनन्य साधारण महत्त्व आहे.यामध्ये महाराष्ट्रसह कर्नाटकातील हजारो भाविक सहभागी होतात.हा उत्सव पाहण्यासाठी नागरिक व महिला वर्ग मोठी गर्दी करतात. विशेषतः सर्व जाती धर्मातील भाविक सहभागी होऊन भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवितात, असे सामाजिक कार्यकर्ते सुनिल पाटील यांनी सांगितले.

# वडापुरात वडाचे झाड लावून अनोखी वटसावित्री पौर्णिमा साजरी

✔ सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर येथे रुक्मिणी महिला ग्रामीण प्रतिष्ठान संचलित जिजाऊ महिला गटाच्या वतीने वडाचे झाड लावून महिलांनी रीतसर पूजा करून वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली.

याप्रसंगी प्रत्येक महिलेला प्रतिष्ठानच्या वतीने रोप देण्यात आले. गेली सात वर्षे हा उपक्रम सुरू आहे..प्रथम वर्षी लावलेले वडाचे झाड आज साधारण पंधरा फूट उंच व डेरेदार झाले आहे. अशी माहिती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुनिता पाटील यांनी दिली. प्रतिष्ठानच्या वतीने आज अखेर



दोनशेपेक्षा जास्त झाडे लावल्याचे सुनिता पाटील यांनी सांगितले यावेळी सदस्य सुरेखा पाटील, प्रियांका पाटील, प्रगती पाटील यांनी वडाचे व वटसावत्री पौर्णिमा याचे सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्व सांगितले. कार्यक्रमास सोसायटी चेअरमन वंदना वाघचवरे, सारिका पाटील मालन पाटील, उषा पाटील, सुरेखा पाटील, ज्योत्स्ना पाटील, विशाखा पाटील, संगीता मोहिते, माधुरी पाटील, ललिता पाटील, प्रियांका पुजारी, राणी पाटील, प्रिया पाटील आदिसह महिलावर्ग उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसाद पाटील, विश्वास पाटील, प्रतीक पाटील यांनी परिश्रम घेतले.

# देवकते प्रशालेचा १०० टक्के निकाल

✔ **सोलापूर** : गुरुदत्त शिक्षण प्रसारक मंडळ कासेगांव संचलित आनंदराव देवकते प्रशाला वडजी (ता.द. सोलापूर) प्रशालेचा माध्यमिक बोर्डाचा निकाल शंभर टक्के लागला. प्रशालेमध्ये प्रथम क्रमांक - दिव्या काकडे ८६.००%,द्वितीय क्रमांक - योगिता राजकुमार हंगरगे ८५.४०%,तृतीय क्रमांक - अंकिता पंडित पवार ८३.२० % गुण घेऊन क्रमांक पटकाविले. संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय गजबार,मार्गदर्शक विश्वास गजबार,शाळा समितीचे अध्यक्ष विठ्ठल हक्के, प्रशालाचे मुख्याध्यापक कल्याण गजबार, शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के,पालक,ग्रामस्थ व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# चंद्रा महावितरणचे नवे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



✔ **सोलापूर** : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून लोकेश चंद्रा (भाप्रसे) यांनी शुक्रवारी पदाची सूत्रे स्वीकारली आहे. याआधी ते मुंबई बेस्ट' उपक्रमाचे महाव्यवस्थापक पदी कार्यरत होते. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा हे १९९३ च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. त्यांनी आयआयटी (दिल्ली) मधून स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी आणि एमटेक (स्ट्रक्चर्स) पदवी प्राप्त केली आहे. चंद्रा यांनी यापूर्वी सिडकोचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून काम केले आहे.

# एस. एस. स्पोर्ट्स ॲकॅडमीतर्फे राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडूंचा सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

नेहरूनगर येथील एस.एस. स्पोर्ट्स ॲकॅडमीतर्फे २०२२-२०२३ मध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंचा सत्कार झाला व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या ९ जणांची पोलीस दलात निवड झालेल्या खेळाडूंचाही सत्कार झाला

पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या नऊ जणांची महाराष्ट्रातील विविध ठिकाणी पोलीस दलात निवड झाली आहे. तसेच सन २०२२-२३ या वर्षामध्ये जिल्हास्तर, विभाग व राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी सभागृह नेता शिवानंद पाटील, सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, एस.आर.पी.एफ. पोलीस बल गट क्रमांक १० चे सहाय्यक समादेशक नानासाहेब मासाळ, कबड्डी राज्य पंच ✻सुभाष माने, आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता काळे हे उपस्थित होते. सर्वांचे मुख्य प्रशिक्षक सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सूर्याजी लिंगडे व अकॅडमीच्या अध्यक्ष भारती लिंगडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खजिनदार



**पोलीस दलात भरती झालेले खेळाडू विद्यार्थी पुढील प्रमाणे**

श्वेता रामगल, मोहिनी कांबळे, मृणमय सावंत, मनोज बामणे, मौलाली शेख, किरण राऊत, हर्ष साबळे, अजय पवार व बिरुराज फुलारी

**जिल्हास्तर, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश मिळवलेले खेळाडू पुढीलप्रमाणे**

अरुल माने, यशवर्धन लिंगडे, शरयू क्षीरसागर, साहिल जगताप, केतन मासाळ, ओम वरवडकर, भक्ती थोरात, आदिती सपकाळ

यशवंत पाथरूट, पोलीस हवालदार, शिवानंद बिराजदार , रेल्वे विभागातील अधिकारी निलेश वरवडकर , विरेश अंगडी, अनिल शितोळे, सिद्धू बिराजदार आदी उपस्थित होते.

# परंडा आगाराच्या एस टी बसला अपघात

✔ सुराज्य/परंडा

## तब्बल ४३ प्रवासी जखमी

समोरील वाहनाला पास करताना बार्शी परंडा रोडवरील सोनगीरी नदी जवळील वळनावर परंडा आगाराची एस टी बस रस्त्याच्या खाली गेल्याने बस पलटी होऊन झालेल्या अपघातात ४३ प्रवासी जखमी झाले हि घटना दि ३ जून रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास घडली.

जखमींना उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामध्ये दत्तात्रय वेताळ, चंद्रभागा वेताळ, नुसरत काझी, मंगल बोराडे, समींना पठाण, तमन्ना पठाण, विश्वनाथ पाडूळे, आफरीन डोंगरे, सहेर सय्यद, अजिनाथ मुळीक, कैलास लांडगे, बाळासाहेब कानगुडे, हारून बेसकर, मेहराज बेसकर, संतोष व्हटकर, सतीस पसारे, अन्नासाहेब काकडे, बाळू काशींद, कैलास लांडगे, साक्षी पाटील, शांताबाई पाटील, कमलाबाई पवार, जुबेदा मुंडे, सोमनाथ गायकवाड, लता गुडे, संगीता धुमाळ, नंदाबाई वाडेकर, सरस्वती जाधव, रमेश जाधव, शिवकन्या दुबवड, दौलतराव नलवडे यांच्या इतर प्रवासी जखमी झाले आहे.

अपघाताची माहिती मिळताच परंडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक फौजदार केरबा कांबळे , पो.ना. क्षिरसागर, शेवाळे, अफरोज शेख, पो.ह. म्हेत्रे , पो.कॉ. यादव यांच्या सह कर्मचाऱ्यांनी घटना स्थळी धाव घेऊन मदत केली.

# प्रिती काळे व रुपेश कोंढाळकर महाराष्ट्र खो-खो संघाचे कर्णधार

✔ सुराज्य/सोलापूर

## शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ रवाना

पंढरपूर तालुक्यातील वाडीकुरोली येथील प्रिती काळे (सोलापूर) व रुपेश कोंढाळकर ( मुंबई) यांची १९ वर्षाखालील महाराष्ट्र खो खो संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली. येथील तालुका क्रीडाधिकारी सुप्रिया गाढवे (मुली ) व स्वामी विवेकानंद प्रशाला जुळे सोलापूरचे क्रिडा शिक्षक श्रीकृष्ण कोळी ( मुले ) हे या संघाचे व्यवस्थापक आहेत.

दिल्ली येथे ६ ते १२ जून दरम्यान होणा-या ६६व्या शालेय राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ रवाना झाले. स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ



महाविद्यालय जुळे सोलापूर येथे दोन्ही संघाच्या सराव शिबिराचा समारोप जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर यांच्या हस्ते झाला. यावेळी किरण स्पोर्टर्स क्लबच्या वतीने दोन्ही संघास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, मुख्याध्यापक अंबादास पांढरे, मरगु जाधव आदी उपस्थित होते.

**संघात उस्मानाबादचे चौघे**

संघात उस्मानाबादच्या ३ मुली आणि एका मुलाचा समावेश आहे. संघ : मुले -रूपेश शांताराम कोंडाळकर (कर्णधार), निखिल तुकाराम सोडये, मयुरेश कैलास मोरे (मुंबई), आदित्य सुरेश शेळके, विश्वजीत विष्णू कुसाळे (कोल्हापूर), हेमंत तुळशीराम ठाकरे (नाशिक), देवांग अंकुश गाडेकर, विवेक दिपक ब्राम्हणे (पुणे), उजेर हारुन मोमिन (सांगली), सचिन खंडू पवार (उस्मानाबाद), फराज आरिफ शेख (सोलापूर), समित शामराव सडमेक (गडचिरोली), संतोष वाबळे( मार्गदर्शक, जालना). मुली - प्रिती अशोक काळे (कर्णधार, सोलापूर), सुहानी भारत धोत्रे, अश्विनी आप्पासाहेब शिंदे, संपदा लहू मोरे (उस्मानाबाद), वृषाली अनंदा भोये,निशा सोमनाथ वैजल ( नाशिक), वैष्णवी बजरंग पोवार (कोल्हापूर), सौंदर्या संजय हिरेकुर्ब(सांगली), दिपाली अर्जून राठोड श्वेता अशोक वाघ ( पुणे), कल्याणी प्रकाश केक, काजल बाबू शेख( ठाणे), मनिषा मानकर (मार्गदर्शक, रायगड).



# हरिभाईच्या दोघांची राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

✔ सुराज्य/सोलापूर

क्रिडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतून हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचे दोघांची राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे दि.६ ते १२ जून २०२३ रोजी , ६६ वी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा , दिल्ली या ठिकाणी होणार आहे . जलतरण डायव्हिंग १ मीटर, ३ मीटर या प्रकारात चेतना अमर डोके हिची व सांगली या ठिकाणी झालेल्या निवड चाचणीतून फराज शेख याची खो - खो या प्रकारात राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.

या निवडीबद्दल शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्य प्रकाश कांबळे, ज्येष्ठ पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने ,पर्यवेक्षक भानुदास बनसोडे ,शांताप्पा कुंभार ,आप्पासाहेब राऊत, लकेश कमळे ,उमाकांत गायकवाड, प्रकाश कंपली व सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या , वरील खेळाडूस क्रीडा शिक्षक प्रा. प्रमोद चुंगे व अक्षय गवळी यांचे मार्गदर्शन लाभले

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# २८ दुकानांवर कारवाई, १८ खाद्यपदार्थ हानीकारक

## अन्न-औषध प्रशासनाचे कारवाई सत्र

सुराज्य/सोलापूर

**चालू आर्थिक वर्षासाठी अन्न औषध प्रशासनास ६९० कारवाईचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी ६८९ ठिकाणी कारवाई करत खाद्य पदार्थाचे नमुने ताब्यात घेतले आहेत. ६८९ पैकी ५४४ चांगल्या प्रतीचे, १८ आरोग्यास हानिकारक, २३ कमी दर्जाचे तर १६ कायद्याचे पालन न केलेले खाद्य पदार्थ आढळून आले आहेत. ८८ खाद्य पदार्थांच्या नमुन्यांचा अद्याप अहवाल प्रलंबित आहे.**



अन्न औषध प्रशासनाने या वर्षभराच्या कालावधीत १२ लाखापेक्षा जास्त उलाढाल असणाऱ्या दुकानावार धाडी घालत कमी दर्जाची २८ प्रकरणांवर कारवाई केली. पुणे विभागीय आयुक्तांकडे दाखल केल्यानंतर १६ प्रकरणी निकाली निघाली आहेत. त्यांच्याकडून तीन लाख दहा हजार रुपयाची दंडात्मक कारवाई केली आहे. तर १२ लाख पेक्षाकमी उलाढाल असलेली दुकानदारवर कारवाई केली असता २५ प्रकरणे तडजोडी करून निकाली काढली आहेत. त्यांच्याकडून तीन लाख १९ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

यंदाच्या वर्षी किरकोळ खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या ६९० दुकानांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट दिले होते. मात्र १०९६ दुकानांची तपासणी करत दोषी आढळून आलेले आठ दुकानांचे परवाने निलंबित केले आहेत. तर एकाचा परवाना रद्द केला आहे.

बारा लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेले एकूण ६९ दुकानदारांकडून तडजोड करून दोन लाख ४० हजाराचा दंड वसूल केला आहे.

आषाढी वारीवर प्रशासन एकीकडे अलर्ट असताना दुसरीकडे पंढरीत येणाऱ्या वारकऱ्यांची भेसळयुक्त पदार्थांमुळे होणारी आरोग्याची हानी टाळण्यासाठी अन्न औषध प्रशासन विभाग सज्ज झाला आहे. भेसळ युक्त खाद्य पदार्थांची तपासणी करण्यासाठी एक लॅबोरेटरी व्हॅनदेखील दाखल होणार आहे तर तपासणीसाठी बाहेरील विभागातून तबबल १५ अतिरिक्त कर्मचाऱ्यांची कुमक मागवली आहे.अन्न औषध प्रशासन विभागाने वर्षभरात विविध भागात कारवाई करत अन्न औषध पदार्थांच्या दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा तबबल ज्यादा काम केले आहे. अनेक नमुने ताब्यात घेतले आहेत. त्याच्यामध्ये खाद्यतेल, चहा पावडर, बेकरीयुक्त पदार्थ, दूधजन्य पदार्थ आणि इतर पदार्थांचा समावेश आहे.

### ८ दुकानांची तपासणी, २६ नमुने ताब्यात

शहर जिल्ह्यामध्ये आतापर्यंत एकूण भेसळीच्या तसेच कालबाह्य झालेल्या अन्नपदार्थांच्या विक्री केल्याच्या संदर्भात ४८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या एक मोहीम घेऊन ५८ दुकानांची तपासणी केली. २६ नमुने ताब्यात घेत दंडात्मक कारवाई केली आहे. जानेवारी महिन्यामध्ये चहा पावडरच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर एक मोहीम घेण्यात आली सात नमुने ताब्यात घेण्यात आले चार चांगले आहेत. तीन नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे.

### चार हजार किमतीचे भेसळयुक्त तेल जप्त

खाद्य तेलासंदर्भात १६ हजार किमतीचे भेसळयुक्त तेल ताब्यात घेतले आहे. यासाठी लहान मोठ्या दुकानाची तपासणी करण्यात आली. जवळपास ४ हजार भेसळयुक्त तेल जप्त केले आहे.

## उसतोड मजूर पुरवतो म्हणून तिघाजणांची ११ लाखांची फसवणूक

**कुर्डूवाडी** : उसतोड मजूर पुरवतो म्हणून तिघा उसवाहतूकदारांकडून ८ कोयती १६ मजूरासाठी प्रत्येकी ११ लाख रुपये घेऊन मजूर न पुरवता फसवणूक केली असल्याची फिर्याद उस वाहतुकदार सुहास गोरख उबाळे रा.महिंसगाव यांनी कुर्डुवाडी पोलिसांत दिली आहे. सन २०२०-२१ या गळीत हंगामासाठी उसतोड मजुरांची आवश्यकता असल्याने फिर्यादी उस वाहतुकदाराने मुकादम कृष्णा फुला राठोड आनंद नगर ता.पाथरी याच्याशी उसतोडून भरून देण्यासाठी ८ कोयती १६ मजूरासाठी कुर्डुवाडी येथे करार करुन करारनाम्यानुसार सदर मजुरांसाठी बँक ऑफ इंडिया शाखेतून कृष्णा फुला राठोड याच्या अकाउंटवरती एकूण ८ लाख रुपये पाठवले.तसेच सौदागर जगताप यांच्या समक्ष महिसगाव येथे ३ लाख रोख दिले. मात्र मजूर काही दिले नाहीत आणि उसतोड मजूरांकरीता दिलेले पैसेही परत देण्यास टाळाटाळ करु लागला.तसेच फिर्यादीचे ओळखीचे अमोल विक्रम उबाळे रा.चिंचगाव व विजय वामन उबाळे रा.महिंसगाव यांच्याकडूनही उसतोड मजूर पुरवतो म्हणून प्रत्येकी ११ लाख रुपये घेऊन फसवणूक केली आहे.

## सांगोला तालुक्याचा दहावीचा निकाल ९८ टक्के

**सांगोला** : सांगोला शहर व तालुक्यातील ७९ शाळांमधून एस एस सी (१० वी ) बोर्ड परीक्षेसाठी बसलेल्या सुमारे ५ हजार ९८ विद्यार्थ्यांपैकी ५ हजार ०६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तालुक्याचा ९८.२६ टक्के निकाल लागला आहे तर ७९ शाळांपैकी २८ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे .यंदाही बारावी परीक्षेतील निकालाप्रमाणे दहावीच्या परीक्षेत मुलींनीच बाजी मारली आहे. सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील ४८६ पैकी ४७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल -९७.७३ टक्के लागला तर न्यू इंग्लिश स्कूल सांगोला-९६.५२ टक्के निकाल लागला आहे दरम्यान सांगोला विद्यामंदिर प्रशालेचा कु. हर्षराज शामराव जगताप या विद्यार्थ्यांने ९९.२० टक्के गुण मिळवून सांगोला तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला तर विद्यामंदिर प्रशालेची कुमारी साक्षी माने हिने- ९८.४० व कुमारी सानिका पाटील ९८.४० या दोघींनी समान गुण मिळवून तालुक्यात द्वितीय तर कुमारी आर्या नवले-९८.२० व कुमारी विद्या घुणे-९८.२० टक्के गुण मिळवून तृतीय आल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे अध्यक्ष प्रा. पी.सी झपके प्राचार्य गंगाधर घोंगडे, पालक वर्ग शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

**अक्कलकोट** : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयाचा मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या १० वी परीक्षेचा निकाल ९४ .४४ इतका लागला असून, विद्यालयात प्रथम कुमारी धनेश्वरी अण्णाराव भुरले- ९४.४५, द्वितीय-कु. साक्षी संभाजी सोलनकर ९१ %, तृतीय- विठ्ठल वाडी व धोंडपा कोरे ९०.२० गुण मिळवून यश संपादन केले आहे. तर ३८ विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत (डीस्टींक्शन) उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीईओ सौ रूपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख सौ पुनम कोकळगी, संचालक मल्लिनाथ मसुती व प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले.

## हर्षवर्धन हायस्कूलची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**सोलापूर** : हिप्परगे तळे येथील हर्षवर्धन हायस्कूलचा एसएससी परीक्षेचा निकाल ९३.८० लागला. प्रशालेत कुमारी प्रतीक्षा शिंदे हिला ९३% गुण मिळाले. तिचा प्रशालेत प्रथम क्रमांक आला. प्रशालेत कुमारी गौरी अमर बिदावत हिला ८८.२०% गुण प्राप्त झाले. तिचा प्रशालेत दुसरा क्रमांक आला आहे तर प्रशालेत तिसरा क्रमांक कुमारी गौरी भैरु शिंदे हिला ८५% गुण मिळालेले आहेत. प्रशालेत परीक्षेसाठी एकूण विद्यार्थी ८७ प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्राविण्य श्रेणीमध्ये १८ विद्यार्थी असून प्रथम श्रेणीमध्ये ३९ विद्यार्थी आहेत तर द्वितीय श्रेणीमध्ये २० विद्यार्थी आहेत पास झालेले विद्यार्थी ४ आहेत या यशाबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व मुख्याध्यापक लक्ष्मण राऊत व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

## अठरा हजारांचा गांजा पकडला

**सोलापूर** : पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेने सापळा रचून मध्यवस्ती येते १८ हजार रुपये किमतीचा ७४१ ग्रॅम गांजा हा अमली पदार्थ पकडला. गुन्हे शाखेचे साह.पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे व त्यांच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार शहरातील मड्डीवस्ती चौक जोशी गल्ली सोलापूर येथील एक इसम एका झाडाच्या आडोशाला उभा राहुन गांजा विक्री करत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर सापळा रचून पकडले.व चौकशी करून त्याची पंचा समक्ष झाडाझडती घेतली असता,त्याच्या पिशवीत विक्रीसाठी असलेला १८ हजार रुपये किमतीचा ७४१ ग्रॅम गांजा आढळला. ईश्वर संगमेश्वर सरवदे (वय-३०,रा.मड्डीवस्ती,जोशी गल्ली, भवानी पेठ सोलापूर) अशी त्या इसमाचे नाव असून, बेकायदेशीररित्या अमली पदार्थ स्वतः जवळ बाळगुन ठेवल्याप्रकरणी त्याच्याविरोधात एनडीपीएस कलमाअंतर्गत कायदेशीर गुन्हा नोंदविला आहे.

## लोखंडी रॉडने मारहाण

सुराज्य/सोलापूर

तीन हजार रुपये देण्याघेण्याच्या कारणावरून तरुणास जोरात ठोसा मारून लोखंडी रॉडने मारहाण करत गंभीररित्या जखमी केल्याची घटना दुर्गा कॅन्टीन जुना कुंभारी नाका येथे घडली.याप्रकरणी राकेश अनंत कोरे (वय-३१,रा.कोंची कोरवी गल्ली) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून संदीप चव्हाण,श्रीकांत कोयलू उर्फ पिल्ली व इतर दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पो.नि. चौधरी हे करीत आहेत.

## डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्यामुळे बाळाचा मृत्यू; तिघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

हॉस्पिटलमध्ये मुलाचा जन्म झाल्यानंतर त्याच्याकडे डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्यामुळे त्या बाळाच्या बेंबीजवळ संसर्ग होऊन बाळाचा मृत्यू झाला.या प्रकरणी बाळाची आई आयेशा गफार शहापूरे (वय-२२,रा. साईनाथ नगर,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून खलील कादरी, इरीन कादरी, ऐमन कादरी यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.



आयेशा या गर्भवती असताना बाळंतपणासाठी त्या १२ जुलै २०२२ मध्ये कादरी हॉस्पिटल येथे दाखल झाल्या. दोन दिवसांनी त्यांनी एका गोंडस बाळाला जन्म दिला. बाळाच्या पोटाजवळ काळे निळे डाग दिसू लागल्याने आयेशा यांनी याची माहिती डॉक्टरांना सांगितली. पण डॉक्टरांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. यामुळे आयेशा यांनी खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार करून बाळाला शासकिय हॉस्पिटल मध्ये दाखल केले.

संसर्ग कमी न झाल्याने त्या बाळाचा मृत्यू झाला. शिवाय आयेशा यांना घातलेल्या टाक्यातून ही पाणी येत असल्याने त्यांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर पैसे भरण्यास सांगितले.पण फिर्यादीकडे पैसे कमी होते, यामुळे डॉक्टरांनी ड्रेसींग केले नाही,अशा आशयाची फिर्याद आयेशा यांनी दिली आहे.

दरम्यान, आयेशा यांनी कादरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या विरूध्द सिव्हिल हॉस्पिटलच्या समितीकडे तक्रार केली.त्या अहवालात कादरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी उपचारात हलगर्जी पणा केल्याचे सांगितले.यामुळे कादरी हॉस्पिटलच्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास सपोनि पेटकर करत आहेत.

## नीरा देवधरमध्ये माळशिरस तालुक्यातील उर्वरित गावांचा समाविष्ट होणार

सुराज्य/सोलापूर

### खा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांची माहिती

निरा देवधर मध्ये माळशिरस तालुक्यातील उर्वरित गावांचा समाविष्ट होणार असल्याची माहिती खा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी पुणे येथील सिंचन भवन बैठकी नंतर पत्रकार परिषदमध्ये ही माहिती दिली. यावेळी आ. शहाजी पाटील, आ. संजय शिंदे, आ. जयकुमार गोरे, आ दिपक चव्हाण आदी उपस्थित होते.

माढा मतदारसंघातील विविध सिंचन प्रकल्पांची माहिती आढावा बैठक शनिवारी सिंचन भवन पुणे येथे झाली. त्यामध्ये माळशिरस तालुक्यातील काही गावे वंचित राहिली होती. त्या मध्ये गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, पिलीव, कोळेगाव, चांदापुरी, तरंगफळ, जळभावी, गोरडवाडी, रेडे, भांब कोथळे, या गावांचा समाविष्ट होणार आहे. तसेच निरा देवधर कॅनॉलचे लवकरच चालू होणार आहे.

निरा देवधर प्रकल्पासाठी ३९४० कोटी मंजूर झाले आहेत. येत्या वीस दिवसांत ५०० कोटींचे टेंडर करण्याचे ठरले आहे. निरा देवधरचे पाणी आत्तापर्यंत बारामती व इंदापूरला जात होते. निरा देवघरचे काम पूर्ण झाल्यानंतर शंभर टक्के पाणी निरा देवधरला देणार आहे. निरा देवघरचे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त केला.

## पूर्ववैमन्यासातून लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर** : पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून नितीन विठ्ठल भोसले (वय-२८,रा.रविवार पेठ,जोशी गल्ली) यांना चौघांनी मारहाण केली. ही घटना ३१ मे रोजी रविवार पेठ जोशी गल्ली येथे घडली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. नागनाथ तुकाराम भोसले व बाबा भोसले यांनी नितीन यांच्या डोक्यात लोखंडी मारून जखमी केले. तसेच गणेश जगताप याने नितीन यांना फायटरने मारून रेणुका भोसले हिने शिवीगाळ करत हाताने मारहाण करून तुला बघून घेतो अशी धमकी दिली आहे. नितीन यांच्या फिर्यादीवरून नागनाथ तुकाराम भोसले,बाबा भोसले,गणेश जगताप,रेणुका भोसले (सर्व.रा.रविवार पेठ, जोशी गल्ली) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. पैकेकरी हे करीत आहेत.



## राठोड यांच्या जयंतीनिमित आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण


सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद सदस्य, दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे माजी सभापती , लोकनेते उमाकांत राठोड यांच्या ७४ व्या जयंती निमित आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

किसनराव मागास समाज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केसर प्रशाला, शक्ती प्राथमिक आश्रम शाळा, शक्ती कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय व चिंतामणी माध्यमिक आश्रम शाळा या संस्थेतील आदर्श मुख्याध्यापक म्हणून रमेश फुलचंद राठोड , अशोक धेनु राठोड, विष्णू धर्मा केत, सुभाष विठ्ठल चव्हाण, यलप्पा बनसोडे या शिक्षकांना व नामदेव ईश्वर राठोड मिथुन राठोड शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार मुंबई महापालिकेचे उपअभियंता श्रीकांत राठोड, माजी पंचायत समिती सदस्य तुकाराम कोळेकर, तोळाराम नाईक, ग्रामपंचयात सदस्य योगिनाथ पवार, धेनु राठोड, धनु माणिक चव्हाण, मल्लू पुढारी, उपसरपंच भोजू पवार आदींच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष व सरपंच विजय उमाकांत राठोड, मनोज राठोड, रतन राठोड, राज साळुंखे, शेख डॉक्टर, राजु वाघमार आदी उपस्थित होते.

## वरिष्ठांसाठी आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धा

सुराज्य/सोलापूर



अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या अधिपत्याखाली दिनांक ५ ते १० जून या कालावधीत सोलापूर येथे वरिष्ठांसाठी लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा महिला व पुरुषांसाठी असूनयात ३०,३५,४०,४५,५०,५५,६५ व ७५ असे एकूण ८ वयोगट असून यात एकेरी व दुहेरी सामान्यांचा समावेश आहे.

या स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथील एम एस एल टी ए टेनिस सेंटर च्या मैदानावर सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत खेळविण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून या स्पर्धेसाठी अखिल भारतीय टेनिस संघटनेने पुण्याच्या वैशाली शेकटकर यांची सामना पर्यवेक्षक , मुंबईच्या दोसा रामाराव यांनी सामना संचालक तर राजीव देसाई यांची कार्यकारी सचिव म्हणून नियुक्ती केली आहे. या स्पर्धेत देशभरातून एकूण ८७ खेळाडू सहभागी होणार आहेत. सहभागी झालेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय गुण मिळणार असून विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना चषक प्रदान करण्यात येणार आहे.

## अकलूज जिल्हा उपरुग्णालयामध्ये बसले नवीन फॅन

### राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचा आक्रमकपणा

सुराज्य/वेळापूर

अकलूज येथील जिल्हा उपरुग्णालयामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.धनंजय साठे हे त्यांच्या आजारी नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले असता त्यांना पहिल्या मजल्यावरील प्रसुतीवार्डातील फॅन कडक उन्हाळयात बंद अवस्थेत दिसले. त्यानंतर त्यांनी प्रशासनास धारेवर धरले. त्यांनतर रूग्णालयाने सर्व वॉर्डात नवीन फॅन बसवले.

यावेळी साठे यांना यांनी तिथल्या रुग्णांना विचारले असता रूग्णांनी फॅन खूप दिवसा पासून बंद आहेत व त्याच्याकडे कुणीही लक्ष देत नाही. त्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल होतात असे सांगितले व जे रुग्ण ॲडमिट होतात ते स्वतःच आपल्या घरून टेबल फॅन घेऊन येतात अशी धक्कादायक माहिती त्यांनी दिली.

त्यानंतर प्रा.डॉ.धनंजय साठे यांनी तातडीने महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक गायकवाड व प्रदेश सचिव तुकाराम साळुंखे पाटील यांना संपर्क साधून त्यांना व सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांना थेट रुग्णालयांमध्ये बोलावुन घेतले व संपूर्ण रुग्णालयाची पाहणी केली. त्यांनतर अशोकगायकवाड, राज्य सचिव तुकाराम साळुंखे पाटील व जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.धनंजय साठे यांनी प्रशासनास धारेवर धरले व सदर फॅन २४ तासामध्ये बसवा अन्यथा वरिष्ठांकडे तक्रार करून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिल्या नंतर दुसऱ्या दिवशी लगेच दुसऱ्या मजल्यावर सर्व महिला प्रसुती वार्डामध्ये नवीन फॅन बसवण्यात आले.

## ‘एसपीएम’मध्ये नाविन्यपूर्ण कांद्यापात कापणी यंत्राची निर्मिती

सुराज्य/सोलापूर

कांदा उत्पादन खर्च बाजार भावापेक्षा जास्त होत आहे, याचा विचार करून एसपीएम तंत्रनिकेतन कुमठे येथील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कांदापात कापणी यंत्र विकसित केले आहे. मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांनी कांदा कापणी यंत्र निर्मिती करण्यासाठी तांत्रिक ज्ञानासह विविध शोधनिबंधाचा अभ्यास केला. ग्रामीण भागातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केली. वापरण्यास सोपे, मर्यादित खर्च व उपयुक्तता इ बाबींचा विचार करून विद्यार्थ्यांनी बुद्धीकौशल्याचा वापर व संशोधनातून कांदा कापणी यंत्र निर्मिती करण्यात केली आहे.



पारंपरिक पद्धतीने कांदा कापणीची कार्यप्रणाली समजून घेऊन, यंत्राच्या साहाय्याने कापणी करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची निर्मिती करण्यात आली, त्यास १५० एम.मए. व्यासाची रोटेटिंग ब्लेड तयार करून, शाफ्टवर आले. हे शाफ्ट फिरविण्यासाठी उच्च मोटारीसह १२वॅट बॅटरींचा वापर करण्यात आला आहे. एकदा बॅटरी चार्जिंग केल्यास मशीन चार तास वापरता येते. हे पूर्ण मशीन एका स्टँड वर बसवण्यात आले असून तो वजनाने हलका असल्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज घेऊन जाता येते. चार तासांमध्ये मशीनच्या साह्याने आठ क्विंटल कांदा कापणी करण्यात येते, या मशीनवर दोन माणसे एकत्र काम करू शकतात.

या प्रकल्पाला शिवकुमार गंगदे, जुबेर शेख, संदीप कवठे व लतीफ शेख या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सादर केला.या यंत्र निर्मितीसाठी कॉलेजच्या प्राचार्या सौ. रोहिणी चव्हाण, विभाग प्रमुख बसवराज स्वामी, प्रकल्प समन्वयक मल्लेशी बगले यांचे मार्गदर्शन लाभले. असा नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केल्याबद्दल संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी पळवल्या

सुराज्य/सोलापूर

दिवसेंदिवस दुचाकी चोरून नेल्याच्या घटनेत वाढ होत असून एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पुन्हा दोन दुचाकी चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आले आहे. पहिली घटना ही दि.२७ ते २८ मेदरम्यान प्रभू कटपीस सेंटर येथे घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.सीएक्स.९९३० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी चेतन अंबादास पल्ली (वय-२६,रा.प्रभू कटपीस सेंटर,महेश नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत. दुसरी घटना ही लक्ष्मीनारायण टॉकीज येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एमएच.१३.एआर.९४२० ही अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावी चा वापर करून चोरून नेली आहे.ही घटना ३० मे रोजी दुपारी बारा ते अडीच वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी मल्लिनाथ कल्लप्पा दसाडे (वय-६२,रा.चपळगाव वाडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

# चिमणी पडणार की पुन्हा प्रश्न रखडणार?

सुराज्य/सोलापूर

**विमानसेवेत अडथळा ठरणारी श्री सिध्देश्वर साखर कारखान्याची अनधिकृत चिमणी पाडण्यासाठीची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली आहे. महापालिकेने दिलेली ४५ दिवसांची मुदत १० जून रोजी संपत आहे. याला केवळ ८ दिवस उरले असून चिमणी पडणार की रखडणार याचीच चर्चा सर्वत्र सुरू आहे.**

केंद्राच्या उड्डाण योजनेत समाविष्ट असूनही सोलापुरातून विमानसेवा सुरू होऊ शकलेली नाही. होटगी रोड विमानतळ परिसरातील श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या को-जनरेशनची अनधिकृत चिमणी विमानसेवेला प्रमुख अडथळा असल्याने विमानसेवा सुरू होत नाही. चिमणी वाचवण्यासाठी कारखान्याने ५ ते ६ वर्षे न्यायालयीन लढा लढला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सुनावणी घेऊन महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी कारखान्याला नोटीस बजावत ४५ दिवसांची मुदत दिली आहे. सोलापुरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आल्यावर त्यांनी कारखान्याच्या चिमणीवर कारवाईचे संकेत दिले होते. त्यानुसार महापालिकनेही यंत्रणा तयार ठेवली आहे. महापालिकेने दिनायस कॉन्ट्रक्ट प्रा. लि. या हैदराबाद येथील कंपनीला १ कोटी १७ लाखप रुपयांचे चिमणी पाडकामाचे टेंडर देण्यात आले आहे. कंपनीने पालिकेकडे १० लाख रूपये ॲडव्हान्स मागितले आहेत. चिमणी पाडण्याची मुदत ११ जून रोजी संपत आहे. कारखान्याने स्वतः हून चिमणी न पाडल्यास महापालिका चिमणीचे पाडकाम करणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले आहे. त्याअनुषंगाने आता महापालिकेने चिमणी पाडकामाच्या दृष्टीने तयारी सुरु केली आहे.

दरम्यान, श्री सिध्देश्वर साखर कारखान्याने राबवलेल्या विस्तारीकरण प्रकल्पाला पर्यावरणीय अनुमत्या (एन्व्हायरमेंट क्लिरन्स) नसल्याने राष्ट्रीय हरित लवादाने १० कोटी ३४ लाख रुपयांची बँक गॅरंटी देण्यास सांगितले आहे.

## सोलापूरकरांना लागली उत्सुकता





### प्रत्येक विभाग आपली जबाबदारी पार पाडेल : आयुक्त

चिमणी पाडकामासाठी देण्यात आलेली मुदत संपत येत आहे. चिमणी पाडण्यासाठी पोलीस प्रशासनासोबत बोलणे झाले आहे. ज्या- त्या विभागाला आपली जबाबदारी दिली आहे ते दिलेल्या सूचनेप्रमाणे पार पाडतील, असे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

### कारखाना परिसरात जमावबंदी आदेश?

सन २०१८ मध्ये चिमणी पाडण्यासाठी महापालिकेची यंत्रणा मक्तेदारासह कारखाना स्थळावर गेली होती, तेंव्हा मोठा विरोध झाला होता. पालिकेच्या अधिकाऱ्यांवर हल्लाही करण्यात आला होता. यावेळी देखील तीव्र विरोधाची शक्यता लक्षात घेऊन कारखाना परिसरात तैनात केला जाणार पोलिसांचा मोठा बंदोबस्त करावा लागण्याची शक्यता आहे. कारखाना परिसरात जमावबंदी आदेश देखील लागण्याची शक्यता आहे.



## तांबवेच्या उपसरपंचपदी खटके-पाटील यांची निवड

**टेंभुर्णी** : तांबवे गावच्या उपसरपंच पदी पैलवान नितीन खटके पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शिवविचार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विजय खटके पाटील सर्व सदस्य यांनी सर्वांनी मिळून एकमताने ही निवड केली. निवडीनिमित्त शिवविचार प्रतिष्ठानतर्फे एमआयडीसी चौकामध्ये सत्कार समारंभ आयोजित केला होता. यावेळी कुणाल जाधव, कैलास लट्टे, अजित कुटे या तीन युवकांची मुंबई पोलीसमध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नागनाथ खटके पाटील, संतोष खटके, गोरख खटके, संजय आबा माने, आबा माने, कैलास माने, दादासाहेब कोल्हे, गणेश व्यवहारे, निवेदक राजाभाऊ पाटील, डॉ. कुंभार, किरण जाधव, नवा नाना खटके, काका पराडे,सचिन पवार बाळासाहेब खटके, रावसाहेब लोंढे, मिस्कीन, हनुमंत ढवळे, सचिन तळेकर, धम्मू नाना भोसले, चंदू करंडे, आप्पा करंडे, बंडू करंडे, आप्पासाहेब लठे, अमोल लट्टे, बाबुराव लट्टे, अक्षय लट्टे, आणि सर्व लट्टे कंपनी दादा खटके, सागर खटके, प्रसाद खटके, गणू भाऊ खटके, अक्षय जाधव, नामदेव व्यवहारे, बबलू व्यवहारे, निलेश माने, बबनराव कोल्हे, दीपक भगत, अक्षय व्यवहारे, सौरभ व्यवहारे, सागर पाटील, मारुती अण्णा माने, बाळासाहेब भगत, ओंकार पाटील,दादा जाधव,बाळू व्यवहारे, धैर्यशील पाटील, ऋषिकेश गुंड, दत्तात्रय खडके, ऋषी खडके, कुणाल ढवळ आदी उपस्थित होते.

## दिलीपराव माने विद्यालयाचा १०० टक्के निकाल



**उ. सोलापूर** : होनसळ येथील दिलीपराव माने विद्यालय होनसळ चा मार्च २३ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस. सी.बोर्ड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विजय वानकर याने ८९.२० - प्रथम, व्दितीय -कु.भारती जयसिंग नागोडे ८३.६०%,, तृतीय -कु चंदना संतोष वानकर ८३.२०% मिळविले आहे.

विद्यालयातुन एकुण ४८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. विशेष प्राविण्य- १३ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत - २० विद्यार्थी यशस्वी झाले.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव भडकुंबे,सभापती रजनीताई संभाजी भडकुंबे,संस्थेचे सचिव विकास बनसोडे,संस्थेचे उपाध्यक्ष अभिजित भडकुंबे,अमित भडकुंबे, सर्व पदाधिकारी,प्राचार्य राजेंद्र मोहोळकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## न्यू हायस्कूल सलगरवाडी १००% निकाल

**उ. सोलापूर** : सलगरवाडी डोनगावरोड येथील न्यू हायस्कूल सोलापूर मार्च २३ मध्ये घेण्यात आलेल्या एस एस सी परीक्षेचा निकाल सलग पाचव्या वर्षी प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. प्रथम क्रमांक कु - साक्षी बसवराज कोळी ८६.४०%, द्रितीय-कु नम्रता युवराज गायकवाड ८४.२०%, तृतीय -कु. संजीवनी अशोक गायकवाड ८३.४०%. एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते,विशेष प्राविण्यसह... एकूण विद्यार्थी १५प्रथम श्रेणीत, ३७ विद्यार्थी यशस्वी झाले. द्रितीय श्रेणीत ८ विद्यार्थी यशस्वी झाले,सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, सर्व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण सर, व माजी पर्यवेक्षक बाबुराव बिराजदार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## जवाहरलाल शेतकी विद्यालयाचा दहावीचा निकाल ९४ टक्के

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या जवाहरलाल शेतकी विदयालयाचा दहावीचा मार्च २०२३ चा निकाल ९४.५४ टक्के लागला आहे .या विदयालयातील ५५ विदयार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक (१) भक्ती शिकारे ८५ टक्के, (२) पुजा शिकारे ८०.८० (३) कु काजल शिंदे ७९.४० टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचे चेअरमन अमरसिंह देशमुख, स्कूल कमिटीचे अध्यक्ष राजेंद्रसिह जहागिरदार, संग्रामसिंह जहागिरदार, सरपंच नितीन मोहिते, संस्थेचे सचिव पवार, मुख्याध्यापक फडतरे आदींनी अभिनंदन केले.

## हनुमानदास तोष्णीवाल यांचे निधन



**सोलापूर** : सम्राट चौक हरी पदम रेसिडेन्सी येथील रहिवासी हनुमानदासजी तोष्णीवाल (वय ८६) यांचे शनिवार दिनांक ३ जून रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पक्षात पाच भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे . माहेश्वरी कन्स्ट्रक्शन से श्री संजय तोष्णीवाल यांचे ते वडील होत.

# १० जूनपर्यंत पालखी मार्गावरील सर्व कामे होतील

## तुषार ठोंबरे यांचे आश्वासन

सुराज्य/अकलूज

पालखी सोहळ्या संदर्भात मंत्री महोदयाकडून आलेल्या सूचनांचे पालन करण्यात येत असून येत्या १० जून पर्यंत या संदर्भातील सर्व प्रश्न मार्गी लागलेले दिसतील तसे आदेश संबंधित विभागांना दिलेले आहेत अशी माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी दैनिक सुराज्यशी बोलताना दिली.

२३ जून रोजी संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा तर २४ रोजी संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्हयात आगमन होत आहे.तसेच इतर संताच्या पालख्याही माळशिरस तालुक्यातुन पंढरपूरकडे जात असतात. वारकऱ्यांचा मुक्काम, विसावा,रिंगण स्थळ तसेच पायी प्रवास करत असताना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवण्याचे नियोजन करण्या संदर्भात तसेच दोन्ही पालखी मार्गावरील रस्त्याची कामे सुरु आसल्याने रहदारीस होत्या येणारे अडथळ्याचे नियोजन करण्या संदर्भात अकलूज विश्रामगृहावर सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्या उपस्थितीत पार पडली.



या बैठकीनंत दैनिक सुराज्यशी बोलताना ते म्हणाले की, पालखी सोहळ्यासाठी लाखो वैष्णव सोलापूर जिल्ह्यात येत असतात यासंदर्भात पालखी सोहळा प्रमुख व मंत्री महोदयामध्ये बैठका झालेल्या त्यातून प्रशासन पातळीवर अनेक सूचना आलेल्या आहेत आणि त्या दिशेने प्रशासन विभागाची वाटचाल सुरू आहे. प्रशासन विभागांना पालखी संदर्भातील सर्व कामांचा निपटारा दहा जूनच्या आत करावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. पालखी मुक्काम ठिकाण, रिंगण सोहळा अशा ठिकाणच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या व त्या संदर्भातील तातडीने कारवाईच्या सूचना दिल्या.

### पाण्याच्या नियोजनासाठी ३५ विहिरींचे अधिग्रहण

पाण्याचे नियोजन उत्कृष्ट व्हावे यासाठी तालुक्यातील आतापर्यंत ३५ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. इरिगेशन विभागाला पाण्यासंदर्भातील योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.पालखी महामार्गावरील जी रस्त्याची कामे प्रलंबित आहेत त्या संदर्भातील सूचना देखील संबंधित महामार्गाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली असल्याची माहिती ठोंबरे यांनी दिली.

## सोलापूर विद्यापीठाकडून मंगळवारी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवज्योत रॅली

सुराज्य/सोलापूर

सोलापूर विद्यापीठाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मंगळवार, दि. ६ जून २०२३ रोजी शिवज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कुलसचिव योगिनी घारे यांनी दिली.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाकडून दिलेल्या निर्देशानुसार ६ जून हा दिवस 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त शिवज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ जून २०२३ रोजी सकाळी ९ वाजता सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केल्यानंतर या रॅलीचे उद्घाटन होणार आहे. त्यानंतर ही शिवज्योत रॅली छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करीत विद्यापीठाकडे निघणार आहे. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आदींचा रॅलीत सहभाग असणार आहे. छत्रपती संभाजी महाराज पुतळा, बाळे, केगाव मार्गे विद्यापीठात आल्यानंतर या रॅलीचा समारोप होणार आहे.

सकाळी १०:४५ वाजता विद्यापीठ सभागृह परिसरात वृक्षारोपण होणार आहे. सकाळी अकरा वाजता प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांचे 'निश्चयाचा महामेरू: नितीवंत प्रजावत्सल छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यानांचे होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत हे असणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांच्याकडून कार्यक्रमाचे नियोजन सुरू आहे.

## पाथरी उपकेंद्र परिसरातील महिलांची आरोग्य तपासणी करा : स्वामी

सुराज्य/उ. सोलापूर

उत्तर तालुक्यातील पाथरी उपकेंद्राच्या परिसरातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात यावेत, वेळोवेळी आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, सुचना देऊनही त्याची अंमलबजावणी ग्रामीण भागात होत नाही ही बाब गंभीर आहे. यापुढे कर्मचाऱ्याने नियुक्तीच्या ठिकाणी राहुन आपले काम करावे अन्यथा कारवाई करावी लागेल अशी जि.प.चे सीईओ दिलीप स्वामी यांनी दिली.

स्वामी यांनी पाथरी उपकेंद्राच्या कामकाजाची पाहणी केली असून यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी सोनिया बागडे,, गटविकास अधिकारी महेश पाटील, श्रीकृष्ण कुरती केंद्र संचालक पहिलवान भरत मेकाले, आरोग्य विभागाचे तालुक्याचे अधिकारी कर्मचारी, आरोग्य उपकेंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.


महिला , मुलींची तपासणी करण्याचे आदेश दिलेले असतानाही पाठपुरावा करण्यात येत नाही, कारण कर्मचारी अधिकारी कामाच्या ठिकाणी राहत नाही, मोठ्या पगारी असून सुद्धा ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या सुविधा दिल्या जात नाहीत, यापुढे शासनाचे आरोग्यविषयक कार्यक्रम सक्षमपणे राबवून नागरिकांना सुविधा दिल्या पाहिजे, त्वरित कामाला सुरूवात करावी असेही सांगितले.

डॉ. प्रिया परदेशी यांनी महिलांच्या आरोग्याच्या तपासण्या केल्यास रोग नियंत्रण करणे सोपे आहे. कॅनडामध्ये आजार होण्याच्या अगोदरच दखल घेऊन सर्व आरोग्य यंत्रणा तपासण्या साठी सतर्क असतात. कुठलीही साथ लवकर नियंत्रण आणण्याकरिता वरील तीन आजारावर नियंत्रण ठेवल्यास भविष्यात कितीही मोठी रोगांची साथ आली तरी आपण त्याला सक्षमपणे सामोरे जाऊ असे सांगितले.

अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कुस्ती स्पर्धाही लावण्यात आल्या. विजयी मल्ल महेंद्र बनसोडे यांना उपसरपंच श्रीमंत बंडगर यांच्या हस्ते रुपये २१ हजार बक्षिस देण्यात आले. ह्यावेळी बांधकाम उप अभियंता दळवी,उप सरपंच श्रीमंत बंडगर, म्हाळाप्पा बंडगर, उमेश पाटील, आनंद बंडगर, संजय वाघमोडे, ग्रामसेवक मीनाक्षी सरवदे, अनुराधा ननवरे, सी आर पी सुनिता गायकवाड, आरोग्य समुदाय अधिकारी प्रिती महांकाळे, ग्रामस्थ उपस्थित होते.

## मोहोळ तालुक्यात शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके मिळणार

सुराज्य/चिखली



समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २४७ , माध्यमिकच्या ६२ आणि खाजगी ४ अशा एकूण ३१३ शाळांना शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण होणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद, माध्यमिक ,आणि खासगी शाळेतील मुलांना मोफत पाठ्यपुस्तके वितरीत केली जाणार आहेत. इयत्ता पहिली ते पाचवीचे २१ हजार ९९७ विद्यार्थी , इयत्ता सहावी ते आठवीचे १३ हजार ८५७ विद्यार्थी असे मिळून एकूण ३५ हजार ८५४ विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके मिळणार आहेत. या अनुषंगाने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची १ लाख ३८ हजार २०० पुस्तके शिक्षण विभागाकडे उपलब्ध झाली असून हि पुस्तके लवकरच तालुकास्तरावरील गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या नियोजनानुसार ७ जूनपासून केंद्र स्तरावर पोहचवली जाणार आहेत. तेथून सदरची पुस्तके हि केंद्राच्या अंतर्गत असणाऱ्या प्रत्येक शाळा स्तरापर्यंत केंद्र प्रमुख यांच्या मार्फत मुख्याध्यापकांकडे पोहचविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके शाळेच्या पहिल्या दिवशी देण्यात येणार असल्यामुळे प्रत्येक शाळास्तरावर पुस्तके पोहचविण्यासाठी शिक्षण विभागानेण जोरदार तयारी सुरू केली आहे

### मुख्याध्यापकासह लोकप्रतिनिधीही उपस्थित राहणार

शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करताना प्रत्येक शाळा स्तरावरील प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती तसेच लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पाठ्यपुस्तके वितरीत करावीत अशा सूचना देखील प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांना शिक्षण विभागाने दिल्या आहेत

## पालिका निवडणूक संदर्भात ठाकरे गटाची आज बैठक

सुराज्य/सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची महानगरपालिका निवडणूक संदर्भी महत्त्वाची बैठक रविवार ४ रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह (सात रस्ता) येथे आयोजित करण्यात आली असल्याचे माहिती शहर प्रमुख विष्णू कारमपुरी यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

बैठकीत सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे. बैठकीत आगामी महानगरपालिका निवडणुकी संदर्भात पक्षबांधणी पुढील दिशा ठरविणे असे विषय राहणार आहेत सदर बैठकीत श्री अनिल कोकीळ साहेब यांच्यासह जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, ग्रामीण जिल्हाप्रमुख अमर पाटील, सह संपर्कप्रमुख उत्तम प्रकाश खंदारे, जिल्हा संघटक प्रा.अजय दासरी उपजिल्हा प्रमुख प्रताप चव्हाण, भीमाशंकर म्हेत्रे,दत्तात्रय (पंत) वानकर ,महिला आघाडीचे जिल्हा संघटिका अस्मिता गायकवाड ,प्रियाताई बसवंती, शहर प्रमुख विष्णुकारामपुरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सोलापूर शहरातील पदाधिकाऱ्यांनी बैठकीला हजर रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## वेळापुरात अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त कार्यक्रम

# महिलांना साडी वाटप, पोलीसपदी निवड झालेल्यांचा सन्मान

सुराज्य/वेळापूर



वेळापूर येथे सामाजिक कार्यकर्ते पिनू येडगे व जयंती उत्सव समितीच्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना साडी वाटप तर पोलीस पदी निवड झालेल्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रारंभी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन बहुजन मुक्ती पार्टी प्रदेश प्रवक्ते काकासाहेब जाधव, अर्धनारी नटेश्वर देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, जि. प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, भाजपा ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष शंकरराव काकुळे, स्वाभिमानी शेतकरी संघटना माढा लोकसभा अध्यक्ष कमलाकर माने देशमुख, शिवामृत दूध संघाचे संचालक सुरेश पिसे, पिनू येडगे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा महिला उपाध्यक्षा अश्विनी भानवसे, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पिसे आदी. मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गरीब गरजू १०० महिलांना सामाजिक कार्यकर्त्या स्मिता पिसे व राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हा उपाध्यक्षा अश्विनी भानवसे यांच्या हस्ते साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच वेळापूर येथील लक्ष करियर अकॅडमी मधील पोलीस भरती झालेल्या दहा विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच दुपारी गझी ढोलचा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाला बहुजन मुक्ती पार्टी प्रदेश प्रवक्ते सुनील जाधव, बाळासाहेब धाईंजे, अमृतराज माने देशमुख, सुरेश पिसे, शंकरराव काकुळे, कमलाकर माने देशमुख , संजय मंडले , तंटामुक्ती युवराज मंडले, अश्विनी भानवसे, स्मिता पिसे, दीपक राऊत, गोपाळआबा क्षीरसागर, विनायक चंदनशिव, स्वप्निल माने देशमुख, लखन मंडले, सदामाय आडसूळ, महेंद्र साठे, प्रदिप सरवदे,संजय पनासे, श्याम मंडले, प्रमोद साळुंखे, मिलिंद साठे, राजाभाऊ जाधव, विनायक भगत, स्वप्निल सरवदे , अशोक जाधव, अर्जुन देवकते, मैनुद्दीन दरवेशी, नाताजी मोहिते, आनंदा पवार , सचिन कुरळे, योगेश शेटे, आदी. उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पिनू लोखंडे, दत्तात्रेय येडगे, सागर जगताप, नितीन कुरळे, ओंकार खराडे, प्रशांत चंदनशिव, बजरंग कानगे, नितीन भाकरे, अनंत मंडले, नारायण सर्वगोड, कमलेश कसबे, ऋषिकेश निंबाळकर, नितीन सरगर, समाधान मंडले, अरुण लोखंडे, यांनी परिश्रम घेतले.

# हरितवारीत दहा हजार वृक्ष लागवड

## निर्मल वारी अंतर्गत सात हजार शौचालये बांधणार

## माळशिरस तालुका काँग्रेस अध्यक्षपदी सतीश पालकर



सुराज्य/अकलूज

माळशिरस तालुका काँग्रेसचे अध्यक्षपदी सतीश पालकर यांची फेरनिवड करण्यात आली असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना काँग्रेसचे जेष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे व जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन वाढदिवसाची भेट दिली आहे. पालकर यांच्या फेरनिवडीबद्दल बोलताना डॉ. धवलसिंह म्हणाले की, 'पालकर यांनी त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात सर्वात जास्त अशी काँग्रेस सदस्य नोंदणी केली आहे, त्यांच्या या कामाची त्यांना पावती तर मिळाली आहेच. परंतु पक्षात चांगले काम करणाऱ्यांचा योग्य तो सन्मान होतो, असा संदेशही या माध्यमातून दिला गेला आहे.सध्या पक्षाला चांगले दिवस आले असून कार्यकर्त्यांनाही चांगले काम करून दाखवण्याची संधी निर्माण झाली आहे. सगळेजण या संधीचे सोने करतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सतीश पालकर याना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या निवासस्थानी व त्यांच्याच हस्ते नियुक्तीपत्र मिळणे हा त्यांचा बहुमान आहे. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस भिमराव बाळगी, प्रदेश ओबीसी उपाध्यक्ष सुधीर लांडे, जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब इनामदार, जिल्हा संघटक रमेश हसापुरे, प्रकाश शिंदे, नवनाथ साठे, विकास शिंदे आदी उपस्थित होते.



## उघडेवाडी ग्रामपंचायतर्फे अहिल्यादेवी पुरस्कार प्रदान

सुराज्य/वेळापूर

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त उघडेवाडी ग्रामपंचायतीमार्फत महाराष्ट्र शासनाच्यावतीने दिला जाणारा राजमाता अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार आशावर्कर दिपाली दत्तात्रय क्षीरसागर व महिला बचत गटाच्या अध्यक्षा मोनिका राजेंद्र भगत यांना सरपंच जिजाबाई तानाजी गवळी व उपसरपंच सिमाली धनंजय साठे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी आशा वर्कर, महिला पोलिस पाटील, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका व उपस्थित सर्व महिलांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सुरुवातीला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना ग्रामपंचायतीच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित ग्रामस्थांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग सोलापूर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी गावचे माजी उपसरपंच तानाजी जगदाळे, सामाजिक कार्यकर्ते मोहन कचरे, मधुकर कोळेकर सर, सयाजीराव उघडे,पोलिस पाटील दिपाली गोडसे, ग्रा. पं. सदस्य नितीनकुमार चौगुले, महेश घोगरे, ग्रामसेवक पी. एम. ठवरे, मुख्याध्यापक शिंदे सर तसेच विठ्ठल कोळेकर, रणजित कोळेकर, कृष्णा देवकते, नयनकुमार चौगुले, भाऊ कचरे, देवा जाधव, डॉ. कोळेकर, दत्तात्रय कोळेकर, आप्पासो कोळेकर, धनाजी खाडे, अनिल कोळेकर आदिसह समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायतीच्यावतीने उघडेवाडी गावचा तरुण गणेश थोरात यांची मुंबई पोलीस खात्यामध्ये भरती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

## परंडा येथील जिल्हा उपरुग्णालयात दिव्यांग तपासणी शिबिर

सुराज्य/परंडा

परंडा येथील जिल्हा उपरुग्णालय येथे दिव्यांग तपासणी शिबिर संपन्न दि. २ जून रोजी परंडा येथे दिव्यांग तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराचे आयोजन उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री तथा आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्या आदेशानुसार परंडा येथे हे शिबिर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी होत असून या शिबिराला शनिवारी अस्थिव्यंग डॉ. अविनाश भोरे व मनोरुग्ण डॉ शिंदे यांच्या टीमने शनिवारी २५ दिव्यांग बांधवांची तपासणी करण्यात आली.

या तपासणीसाठी उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हा चिकित्सक राजाभाऊ गलांडे यांनी सहकार्य केले तसेच परांडा येथील ग्रामीण रुग्णालयामधील स्टाफ व नर्स यांनी या शिबिरासाठी सहकार्य केले. या तपासणीच्या वेळी दिव्यांग उद्योग समूहाचे अध्यक्ष तानाजी घोडके परांडा शहराध्यक्ष गोरख देशमाने भाजपा जिल्हा उपाध्यक्ष उत्तम शिंदे राहुल कारकर, जीवन तिपाले, पत्रकार प्रकाश काशीद, तालुक्यातील दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### सिईओ दिलीप स्वामी यांची माहिती
### आषाढी यात्रा आढावा बैठक

सुराज्य/सोलापूर

**पुढील महिन्यात होणाऱ्या आषाढीच्या हरित वारीत दहा हजार वृक्ष लागवड तर निर्मल वारी अंतर्गत सात हजार शौचालय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी यांनी दिली. शासनाकडे पालखी मार्गावरील ग्रामपंचायतीसाठी ३ कोटी १५ लक्ष रूपये निधीची मागणी करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.**

जिल्हा परिषदेस मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी यांच्या निजी कक्षात पालखी मार्गावरील ग्रामपंचायतीचे गटविकास अधिकारी व सरपंच व ग्रामसेवकांच्या बैठकीचे आयोजन करणेत आले आहे. या बैठकीत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, उत्तर सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, समन्वयक वैभव ओहाळे उपस्थित होते.



स्वच्छ वारी निर्मल वारी, या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यात पालखी सोहळा आल्यानंतर महिला वारकरी यांच्यासाठी सुविधा देण्यात येत आहेत. पालखी मार्गांवर हरिकणी कक्ष उभारण्यात येत आहेत. आरोग्य विभाग यांच्यावतीने पालखी मार्गांवर विश्रांती (पालखी विसावा) व मुक्कामाच्या ठिकाणी वैद्यक कक्षाच्या शेजारी हिरकणी कक्ष उभारण्यात येत आहे.

मुख्यमंत्री यांनी दिलेल्या सूचनेनुसार हरित वारी अंतर्गत वृक्षारोपण व वारकरी यांना उन्हापासून संरक्षण मिळण्यासाठी आसरा उभारण्यात येणार आहे. स्वच्छता व शुध्द पाणी व पालखी मार्ग कचरामुक्त करण्यासाठीच्या सूचना सिईओ दिलीप स्वानी यांनी दिल्या.



### महिलांसाठी खास सुविधा असणार

मासिक पाळी व्यवस्थापन अंतर्गत महिलांसाठी सुविधा देण्यात येत असून महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन सुविधा आरोग्य विभागाच्यावतीने पुरविण्यात येत आहे. फिरते चित्ररथ यांच्याद्वारा सॅनिटरी नॅपकीन ठेवण्यासाठी व्हेडींग मशीन व हिरकणी कक्षाचे बाजूस इन्सीनेटर सुविधा देण्यात येत आहे. मुक्कामाच्या ठिकाणी ठेवण्यात आलेले १ हजार शौचालयामधील ४० टक्के शौचालय महिलांसाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. शौचालयासाठी दिशा दर्शक फलक, महिलांचे स्टिकर, शौचालय सुविधा असलेला नकाशा, मासिक पाळीच्या वेळी चेजींग रूमची सुविधा या ठिकाणी देण्यात येत आहेत, असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले.

### पालखी तळाची स्वच्छता सुधारणा करा : शेळकंदे

पालखी तळ व परिसराची स्वच्छता ठेवा. आरोग्य विभागाअंतर्गत पाणी स्त्रोताचे सर्वेक्षण, पाणी नमुने तपासणी, अशुध्द पाणी नमुने स्त्रोताची फेर तपासणी, टँकर भरणा ठिकाणाचे शुध्दीकरण, टँकर तपासणी, टँकरवर स्टीकर लावणे यासाठी कालावधी आखून दिला असून माळशिरस व पंढरपूर तालुक्यांसाठी कार्यवाही करण्यासाठी कालावधी निश्चित करून देण्यात आला आहे. पालखी तळावर सुरक्षिततेसाठी बांबूचे सुरक्षा कठडे करा. नियोजनात या बाबींचा समावेश करा, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी सांगितले.

### गुरसाळे व भटुंबरे हद्दीत वारकरी तळ : कोहिनकर

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सुचविल्याप्रमाणे शहरातील गर्दी कमी करण्यासाठी गुरसाळे व भटुंबरे हद्दीत वारकरी तळ करण्यात येत आहे. या मार्गांवर चार दिवसाची कालावधी जादा शौचालयाची मागणी करण्यात आली असल्याचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी सांगितले.

## आ. रणजितसिंहांकडून राज ऍग्रो कोल्ड स्टोरेजच्या नुकसानीची पाहणी

सुराज्य/श्रीपूर

महाळुंग-श्रीपुर येथील राज ऍग्रोच्या कोल्ड स्टोरेजला गुरुवारी सायंकाळी लागलेल्या आगीत शेतकऱ्यांनी ठेवलेल्या कोट्यावधी रुपयांचा शेतमाल आगीच्या भक्षस्थानी पडला . त्याचबरोबर कोल्ड स्टोरेज चे करोडो रुपयांचे नुकसान झाले. याची पाहणी आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील यांनी केली.

यासंदर्भात शासकिय पातळीवर नुकसान भरपाई मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार रणजितसिंह यांनी सांगितले . यावेळी कोल्ड स्टोरेज चे मालक -संचालक राजेंद्र घोगरे , स्वप्निल घोगरे तसेच माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रतापराव पाटील, नितीन इंगोले देशमुख , सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर



कारखान्याचे संचालक व ज्येष्ठ नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, नगरसेवक सोमनाथ मुंडफणे, तानाजी भगत, प्रकाश नवगिरे , निनाद पटवर्धन, रतन सिंह रजपूत, तसेच जि प सदस्य अरुण तोडकर,माजी जी प सदस्य सुहास गाडे, संदीप घाडगे , देविदास काळे, बापू जाधव , सतीश पवार , धनाजी जमदाडे, मदन भगत, राजु शिंदे आदी. उपस्थित होते.



## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले

सुराज्य/कुर्डूवाडी : रेल्वेने झोपून प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने खिडकीतून हात घालून चोरून नेले. ही घटना दि. १ जून रोजी रा.१२.४५ मि. वडशिंगे येथे घडली. याबाबत प्रभावती प्रभाकर कामुर्ती, रा. सोलापूर यांनी कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी प्रभावती कामुर्ती या राजकोट एक्सप्रेस (२२७१७) गाडीने बोगी न. एस ९ बर्थ नं. ४४ वरुन अहमदाबाद ते सोलापूर असा झोपून प्रवास करत असताना गाडी वडशिंगे येथे होमसिग्नल कट झाल्याने थांबली होती. दरम्यान फिर्यादी कामुर्ती या झोपी गेल्या होत्या. याचाच फायदा घेत अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या गळ्यातील २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खिडकीतून हात घालून तोडून नेले. याचवेळी बोगी नं. एस ८ व एस ९ मध्येही चोरी झाल्याचे समजते.

### रायगड प्रतिष्ठानचा उपक्रम

## सोलापुरातील वारकऱ्यांची रायगडावर किर्तन सेवा

सुराज्य/सोलापूर

'मंदिरातील देव आणि मंदिरावरील कळस राहिलेत ते फक्त शिवरायांच्यामुळे राहिलेत. घराघरावर भगवा ध्वज लावण्याचे धाडस वर्तमान काळात तरुणांमध्ये दिसून येत आहे. त्याला कारण शिवविचार आहेत. जाहीरपणे कीर्तन करण्याचा अधिकार हा शिवरायांमुळे मिळाला, असे कीर्तनातून इंगळे महाराजांनी सांगितले.

दुर्गराज रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्यभिषेक सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुधाकरमहाराज इंगळे (राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भाविक वारकरी मंडळ) यांचे रायगड प्रतिष्ठान



निराळे वस्ती यांच्या माध्यमातून रायगड किल्ला येथे ऐतिहासिक कीर्तन आयोजित करण्यात आले होता.

या कीर्तन सोहळ्यात इंगळे महाराज बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची समाज मनाला खूप गरज आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या मनामनात शिवविचार निर्माण होणे काळाची गरज आहे. 'आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।। संत तुकाराम महाराजांच्या या अभंगावर कीर्तन करत असताना शिवरायांची धर्मनिष्ठा, स्वराज्य प्रेम, त्याग इ. विषय सप्रमाण पटवून देण्याचा प्रयत्न केला. रायगड येथे कोकण कडा मंडळ यांच्याकडे सोहळ्याचे आयोजन असते.

या मंडळाच्यावतीने सुरेश पवार यांनी गडावर पहिलेच कीर्तन केल्यामुळे सुधाकर महाराज इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. कीर्तनातील विशेष आकर्षण म्हणजे सर्व टाळकरी तरुण असून उत्साही दिसत होते. हभप जोतिराम चांगभले, हभप बळीराम जांभळे, दत्तात्रय अंबी, सचिन भोसले, गोविंद ताटे, हृषिकेश झांबरे, अजिंक्य मोरे आदी शिवभक्तांनी परिश्रम घेतले.

## शिवप्रभू प्रशालेचा शंभर टक्के निकाल

सुराज्य/सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवप्रभू माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय अकोलेकाटी या शाळेचा एसएससी बोर्डाचा निकाल १०० लागला आहे.

स्मरणिका मोटे हिने ९३ टक्के गुण मिळवत प्रथम, श्रुतिका कुंभार हिने ९१.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक, धनश्री जांभळे हिने ८८.६० गुण मिळवत तृतीय क्रमांक प्रेरणा मस्के, सौंदर्या सुरवसे हिने ८४.६० गुण मिळवत विभागून चौथा क्रमांक मिळवला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष पुरुषोत्तम बरडे, मुख्याध्यापक शंकर वडणे यांनी केले आहे.

## ग्रामीण भागाच्या विकासात डॉ. रोंगे यांचे कार्य मोलाचे

### अभिनेते अनासपुरे यांचे गौरवोद्‌गार

सुराज्य/पंढरपूर

आयआयटीमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर जवळपास ८० टक्के विद्यार्थी परदेशात जातात आणि तेथे सेवा करतात. परंतु डॉ. बी. पी. रोंगे सरांनी आयआयटीमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर परदेशात न जाता भारतातच राहणे पसंत केले. पंढरपूरसारख्या ग्रामीण भागामध्ये कोणतीही आर्थिक अथवा राजकीय पार्श्वभूमी नसताना पंढरपूरसारख्या ग्रामीण भागात इंजिनिअरिंग



कॉलेज सुरू करण्याचे अवघड कार्य त्यांनी केले, ही बाब खूप गौरवास्पद आहे, असे प्रतिपादन 'नाम' फाउंडेशनचे अध्यक्ष व अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केले.

समस्त बागल परिवार व नातेवाईक यांच्या संकल्पनेतून गोपाळपूर (पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या मध्यवर्ती असलेल्या ओपन थिएटरमध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांचा 'ग्रंथतुला व सत्कार समारंभ' हे कार्यक्रम संपन्न झाले, याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेते मकरंद अनासपुरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप बद्रिनाथ (बाबा) तनपुरे महाराज हे होते. प्रास्ताविकात डॉ. विश्वासराव मोरे यांनी सचिव व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सरांच्या बालपणीपासून ते ६१ वर्षे वयापर्यंतच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे सांगितले.

अनासपुरे म्हणाले की, सध्याच्या स्पर्धात्मक युगात स्वेरीची वाटचाल अविरतपणे सुरू आहे. आपली परंपरा व संस्कृती जपून विकासाचे कार्य पुढे नेणे ही सहज व साधी गोष्ट नाही. यावेळी विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील म्हणाले की, 'रोंगे सरांची दूरदृष्टीकोनातून व मार्गदर्शनाखाली आज विठ्ठल कारखाना ऊर्जितावस्थेत आला'. माजी राज्यमंत्री शेखर चरेगावकर म्हणाले की, 'कोणत्याही फळाची अपेक्षा न करता केलेले कार्य सरस ठरते. ज्ञानाचा व भक्तीचा सुरेल संगम डॉ. रोंगे सरांच्या जीवनात पहावयास मिळतो'. यावेळी ह.भ.प. तनपुरे महाराज यांचेही भाषण झाले.



सोलापूर शहरात शनिवारी वटपौर्णिमेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. जन्मोजन्मी हाच पती मिळावा अशी प्रार्थना करत महिलांनी वडाच्या झाडाला फेऱ्या मारुन पूजन केले.

## महत्त्वाचे वृत्त

### छत्रपती शिवरायांच्या १४ फुटी पुतळ्याचे आज अनावरण होणार

सुराज्य/नवी दिल्ली : छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळा मोठ्या थाटात रायगडावर साजरा करण्यात आला. या राज्यभिषेक सोहळ्यानिमित्त आता भारताबाहेरील इतर ठिकाणीही कार्यक्रम साजरे होणार आहेत. मॉरिशसमध्ये आज (४ जून) छत्रपती शिवाजी महाराजांच्या १४ फूट फायबर पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. मॉरिशसमध्ये मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्ट, कला आणि सांस्कृतिक वारसा मंत्रालयाच्या अधिपत्याखाली अर्जून पुतळाजी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनाच्या संदर्भात अशा प्रकारचा पहिला कार्यक्रम ४ जून २०२३ रोजी ब्लॅक नदीतील गणेश पावन मंदिर येथे शिवाजी महाराजांच्या १४ फूट फायबर पुतळ्याचे अनावरण केले जाईल. या कार्यक्रमास मॉरिशसचे उपराष्ट्रपती मारिये सिरिल इडी बोईसेसजॉन उपस्थित राहणार आहेत. त्याच्याशिवाय स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांसह इतर १०० कलाकारांचा समावेश असलेला सांस्कृतिक कार्यक्रमही सादर होणार आहे.



### देशी बनावटीचे पिस्तूल विक्री करणारा अटकेत

पुणे : देशी बनावटीचे पिस्तूल विक्री करण्यासाठी आलेल्या एकाला पोलिसांनी सिंहगड रस्ता परिसरात पकडले. त्याच्याकडून पिस्तूल आणि एक काडतूस जप्त करण्यात आले. वैभव विजय वाल्हेकर (वय २९,रा. कामथडी, ता. भोर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. नऱ्हे भागात एक जण पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यातील गस्त घालणारे पोलीस कर्मचारी अमोल तांबे आणि माने यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून वाल्हेकरला पकडले. त्याच्याकडे असलेल्या पिशवीची तपासणी केली असता देशी बनावटीचे पिस्तूल आणि काडतूस सापडले.

### पालघरमध्ये भूकंपाचे दोन सौम्य धक्के

पालघर : पालघरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. संध्याकाळच्या सुमारास भूकंपाचे दोन धक्के जाणवले. हे धक्के सौम्य असल्याचं सांगण्यात येत आहे. भूकंपाच्या धक्क्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण परसलं होतं. भूकपांच्या धक्कांनी कोणतीही जीवितहानी झाली नाही. पहिला भूकंपाचा धक्का ३.३ रिश्टर स्केलचा असून, तो ५ वाजून १५ मिनिटांनी जाणवला. तर, दुसरा भूकंपाचा धक्का ३.५ रिश्टर स्केलचा होता. हा धक्का अवघ्या १३ मिनिटांच्या अंतरांनी म्हणजेच ५.२८ मिनिटांनी नोंदवण्यात आला.

### बचत गटाच्या महिला कर्जाच्या विळख्यात

छत्रपती संभाजीनगर : बचत गटाच्या गेल्या दोन दशकांतील बांधणीतून सरासरी प्रत्येकी ४० ते ४५ हजारांचे कर्ज घेण्याची क्षमता असणाऱ्या दहा पैकी पाच महिला आता लघु वित्तीय कंपन्यांच्या (मायक्रो फायनान्स) २५ टक्क्यांपर्यंतच्या व्याजदराच्या कर्जविळख्यात अडकल्या आहेत. लघु वित्तीय कंपन्यांवर अंकुश ठेवणारी राज्य सरकारची यंत्रणा नसल्याने त्या मोकाट सुटल्याचे चित्र आहे. राज्यात या लघुवित्तीय कंपन्यांवर नियंत्रणाची व्यवस्थाच नसल्याने कर्ज हप्ता वसुलीसाठी महिला बचत गट चालविणाऱ्या प्रमुख व्यक्तींच्या घरी वसुली कर्मचारी रात्री उशिरापर्यंत ठाण मांडत असल्याचे सांगण्यात येते.

### अपघातग्रस्तांच्या उपचारासाठी रक्षकांची फळी

नागपूर : केव्हाही कुठेही,कुणाचाही रस्ते अपघात झाल्यास त्या जखमी ला त्वरित प्रथमोपचार मिळावा आणि जखमीचे प्राण वाचावे या हेतूने नागरिकांना प्रथमोपचार प्रशिक्षण देण्यासाठी रोडमार्क फाऊंडेशन'ने पुढाकार घेतला आहे. अपघातात जखमी व्यक्तीला मदत करणे हे राष्ट्रीय कर्तव्य समजून त्याच्या उपचारासाठी धावून जाणे ही भावना निर्माण करण्यासाठी फाऊंडेशने अध्यक्ष राजू वाघ यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. यातून मदत करणारी एक फळी तयार झाल्यास रस्त्यावर एकही जखमी तरफडताना दिसणार नाही, अशी त्यांची भावना आहे.

### वस्त्रोद्योगाचे अनुदान आता मर्यादित कालावधीसाठी

कोल्हापूर : राज्य शासनाचे २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक अपेक्षित असणारे वस्त्र उद्योग धोरण मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाल्यानंतर शुक्रवारी शासन निर्णयाद्वारे या धोरणावर सविस्तर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.

वस्त्रोद्योगाची विजेची सवलत ही अवघ्या दोन वर्षांसाठी असल्याने तो वस्त्र उद्योजकांना धक्का ठरला आहे. त्यांना सौर ऊर्जेकडे जाण्यासाठी प्रवृत्त करण्यावर भर दिला आहे. सहकारी सूतगिरण्यांच्या खासगीकरणाचा घाट घातला आहे. नवीन उद्योगाच्या अनुदानात पक्षपात असल्याने प्रादेशिक वादाला तोंड फुटले असताना शासन अनुदानाचा भार अधिक काळ वाहणार नसल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित केले आहे. एकंदरीत हे धोरण 'कही खुशी काही गम' असल्याचे दिसत आहे.

### राऊतांविरोधात जोडे मारो आंदोलन

नवी मुंबई : खा. संजय राऊत यांनी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात केलेल्या कथित वक्तव्याचा निषेध राऊत यांच्या फोटोला जोडे मारत ऐरोली येथे करण्यात आला.

शिवसेनेच्या ऐरोली येथील मध्यवर्ती कार्यालयासमोर राऊत यांच्या विरोधात घोषणाबाजीही करण्यात आली. यावेळी महिला कार्यकर्त्यांची संख्याही मोठी होती. राऊत यांच्या फोटोला जोडे मारत आंदोलन केल्यानंतर फोटोचा फ्लेक्स फाडून कचऱ्याच्या डब्यात टाकण्यात आला. यावेळी शिवसेना युवा अध्यक्ष मनीत चौघुलेसह शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### सेवानिवृत्तीच्या दुसऱ्याच दिवशी हृदयविकाराचा झटका

पुणे : पुणे शहर पोलीस दलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पोलीस हवालदार प्रकाश यादव (वय ५८) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. या घटनेमुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रकाश यादव हे पुणे पोलिसांच्या शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात असलेल्या व्यायाम शाळेत प्रशिक्षक होते. यादव बुधवारी पोलीस दलातून निवृत्त झाले. निवृत्ती झाल्यानंतर त्यांचा गुरुवारी राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

### सौंदर्य प्रसाधनाच्या दुकानात तलवारी

अहमदनगर : शहराच्या बाजारपेठेतील मोची गल्ली भागात असलेल्या महावीर स्टोअर्स या सौंदर्य प्रसाधनाच्या दुकानात पोलिसांना तलवारी आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या दुकानातून पोलिसांनी सहा तलवारी जप्त केल्या. या तलवारी दुकानात विकण्यासाठी ठेवल्या होत्या की अन्य उद्देशाने ठेवल्या होत्या याचा तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणी मालक नंदकिशोर मोडालाल बायड (वय ५३) याला पोलिसांनी अटक केली आहे. कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.

# ओडिशा रेल्वे अपघातात २८८ लोकांचा मृत्यू

सुराज्य/नवी दिल्ली

**ओडिशातील बालासोर जिल्ह्यातील बहनगा रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी (२ जून) संध्याकाळीत साडेसातच्या सुमारास तीन ट्रेनचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात आतापर्यंत २८८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ९०० प्रवासी जखमी झाल्याची माहिती रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली आहे. भारतातील हा सर्वात भीषण रेल्वे अपघात असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.**



शुक्रवारी संध्याकाळी बहनागा स्टेशनजवळ कोरोमंडल एक्सप्रेस आणि मालगाडीची धडक झाल्याची माहिती समोर आली होती. पण ओडिशाचे मुख्य सचिव प्रदीप जेना यांनी तीन गाड्यांचा समावेश असल्याचे सांगितले आहे. बहनगा स्टेशनजवळ घडलेल्या या अपघातानंतर आतापर्यंत १८ गाड्या रद्द करण्यात आल्या तर अनेक गाड्यांचे मार्ग वळवण्यात आले आहेत. ओडिशाचे मुख्य सचिव प्रदीप जेना यांनी सांगितले की, बालासोर जिल्ह्यात २०० हून अधिक रुग्णवाहिका घटनास्थळी पाठवण्यात आल्या आहेत, तर ओडिशातील अग्निशमन विभागाचे महासंचालक सुधांशू सारंगी यांनी सांगितले की, आतापर्यंत २०७ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. या भीषण अपघातानंतर भुवनेश्वर आणि कोलकाता येथून बचाव पथके आणि एनडीआरएफ, राज्य सरकारची पथके आणि हवाई दलही दुर्घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांच्याकडून बचाव कार्यासाठी लागणारे सर्व प्रयत्न आम्ही करत आहोत.

**अपघाताच्या चौकशीसाठी उच्च समिती गठीत**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी सकाळी दुर्घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना अपघातासंबंधी माहिती दिली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, 'या प्रकारचा मोठा अपघात पहिल्यांदा झाला आहे. त्यामुळे जेवढे प्रयत्न करू तेवढे कमी आहेत. या अपघातात मृत्यू झालेल्या नागरिकांसाठी मी प्रार्थना करतो आणि सर्व जखमी झालेल्या नागरिकांना कटक, भुवनेश्वर, कलकत्ता कुठेही जिथे चांगली आरोग्य सेवा दिली जाईल. या अपघातात जखमी आणि मृत्यू नागरिकांसाठी शुक्रवारी रात्रीच मदत जाहीर करण्यात आली आहे. या अपघाताची चौकशी करण्यासाठी एक उच्च समिती गठीत केली आहे. कमिशनर रेल्वे कमिटीलाही बोलावण्यात आले आहे, तेही चौकशी करतील. हा अपघात कसा झाला याची माहिती घेतली जाईल. आता सर्व फोकस बचाव करण्यावर आहे. या अपघातात ज्यांना गंभीर दुखापत झाली आहे, त्यांना चांगल्या रुग्णालयात पाठवून त्यांच्यावर उपचार केले जातील आणि त्यांच्या नातेवाईकांपर्यंत त्या रुग्णांची माहिती पोहचवली जाईल, अशी माहिती रेल्वेमंत्र्यांनी दिली.

**अपघात नेमका कशामुळे झाला?**

कोरोमंडल एक्सप्रेस आणि मालगाडी या दोन्ही गाड्या एकाचवेळी एकाच रुळावर आल्याने हा अपघात झाल्याचे समजते. सिग्नल यंत्रणेतील खराबीमुळे दोन्ही गाड्या एकाचवेळी एका रुळावर आल्याचे सांगितले जात आहे. कोरोमंडल एक्सप्रेस ही चेन्नई ते पश्चिम बंगालमधील हावडामार्गे ओडिशापर्यंत धावते.

**दु:खाच्या प्रसंगी माझे विचार शोकाकुल परिवारासोबत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत ओडिशातील रेल्वे अपघातामुळे व्यथित झाल्याचे म्हटले आहे. मोदी म्हणाले की, 'या दु:खाच्या प्रसंगी माझे विचार शोकाकुल परिवारासोबत आहेत. जखमी लवकर बरे होवोत. रेल्वेमंत्र्यांशी बोलून परिस्थितीचा आढावा घेतला आहे. दुर्घटनेच्या ठिकाणी बचावकार्य सुरू असून बाधितांना शक्य ती सर्व मदत केली जात आहे.'

**जखमींसाठी मी प्रार्थना करते**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ट्वीट करत म्हटले की, 'बालासोर, ओडिशा येथे झालेल्या दुर्दैवी रेल्वे अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल जाणून घेऊन खूप दु:ख झाले. 'या दु:खाच्या प्रसंगी माझे विचार शोकाकुल परिवारासोबत आहेत. बचाव कार्य यशस्वी व्हावे आणि जखमी लवकर बरे व्हावे यासाठी मी प्रार्थना करते.

रामजन्मभूमी प्रकरण

# निर्णय टाळण्यासाठी आपल्यावर दबाव

## माजी न्यायमूर्तींचा दावा

सुराज्य/नवी दिल्ली

'अयोध्येतील रामजन्म भूमीप्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सुधीर अग्रवाल यांनी एक धक्कादायक वक्तव्य केले आहे. अयोध्येतील रामजन्मभूमी प्रकरणाचा निर्णय पुढे ढकलण्यासाठी आपल्यावर खूप दबाव होता. निर्णय रखडवण्याची लोकांची इच्छा होती, असा निर्णय कोणालाच घ्यायचा नव्हता. पण मी ते केले असते तर, हा निर्णय पुढील २०० वर्षे तरी लागला नसता', असे माजी न्यायमूर्ती अग्रवाल म्हणाले.

निकाल देताना मी कोणत्याही तणावाखाली नव्हतो. पण जेव्हा अटकेत असलेल्या काही लोकांनी सांगितले की, 'या प्रकरणाचा निर्णय देणाऱ्या न्यायमूर्तींना ठार मारायचे आहे, तेव्हा अर्थातच माझे कुटुंब तणावाखाली होते.

या दबावाची माहिती मी माझ्या आत्मचरित्रात दिली आहे, असे माजी न्यायमूर्ती अग्रवाल यांनी सांगितले. मेरठ कॉलेजमध्ये एका कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आले होते. रामजन्मभूमी प्रकरणी ३० सप्टेंबर २०१० रोजी निकाल देण्यात आला होता.'

अयोध्या प्रकरणाची सुनावणी घेणाऱ्या खंडपीठात माझे नाव समाविष्ट करण्याची चर्चा झाली, तेव्हा सरन्यायाधीशांनी विचारले, 'ब्रदर, या खंडपीठात आम्ही तुम्हाला ठेवू इच्छितो,





तुमचा काही आक्षेप आहे का? मी म्हणालो, 'तुम्ही माझी नियुक्ती करू शकता, पण माझी नियुक्ती झाली तर मी या खटल्याचा निकाल देईन, असे माजी न्यायमूर्ती म्हणाले. या प्रकरणावर आपण दोन वर्षे सातत्याने १८ ते २० तास काम केल्याचेही त्यांनी सांगितले.

मी गुजरात, महाराष्ट्र, दक्षिण भारत आणि ईशान्येकडे असा प्रवास केला आहे. श्री रामजन्मभूमीच्या निर्णयामुळे माझी सर्वत्र ओळख झाल्याचे जाणवले. मी जेव्हा पहिल्यांदा चेन्नईला गेलो होतो तेव्हा तिथे लोकांनी माझे फोटो काढले आणि माझ्या पाया पडले. यावरून श्रीरामाची आपल्या जीवनावर किती अमीट छाप आहे, हे लक्षात येते, असेही जस्टीस अग्रवाल म्हणाले.'

# डॉ. लहाने यांच्यासह इतरांचे राजीनामे मंजूर

### मार्डच्या संघर्षाला यश

सुराज्य/मुंबई : मुंबईतील प्रसिद्ध अशा जे. जे. रुग्णालयातील डॉ. तात्याराव लहाने आणि त्यांच्यासह ९ वरिष्ठ डॉक्टरांनी गुरुवारी (१ मे) तडकाफडकी दिलेले राजीनामे राज्य शासनाने मंजूर केले आहेत. आता त्यांच्या जागी लवकरच नवी नियुक्ती करण्यात येणार आहे.

जे. जे. रुग्णालयातील नेत्रशल्यचिकित्सा विभागाच्या प्रमुख डॉ. रागिणी पारेख आणि डॉ. तात्याराव लहाने यांच्याकडून झालेल्या छळवणुकीविरोधात निवासी डॉक्टरांच्या 'मार्ड' संघटनेने संप पुकारला होता. याबाबत जे. जे. रुग्णालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या २८ निवासी डॉक्टरांनी अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांच्याकडे मार्ड





(MARD) संघटनेमार्फत तक्रार केली होती. त्याच्या आधारे डॉ. गजानन चव्हाण यांच्यासह अधिष्ठातांनी नेत्र विभाग प्रमुखांकडे स्पष्टीकरण मागितले. त्याच्याबरोबरीने डॉ. अशोक आनंद यांच्या अध्यक्षतेखील चौकशी समिती देखील नेमली. महिला छळ प्रकरणी डॉ. रागिणी पारेख यांनी डॉ. अशोक आनंद यांची यापूर्वी चौकशी केली आहे. तसेच त्यांनी डॉ. तात्याराव लहाने, डॉ. रणजीत माणकेश्वर, डॉ. भंडारवार, डॉ. एकनाथ पवार, डॉ. अभीचंदानी यांच्याविरुद्ध अॅट्रॉसिटीअंतर्गत पोलिसात तक्रार दाखल केली होती.

### जी भूमिका घेईल ती छातीठोकपणे : पंकजा

सुराज्य/मुंबई : स्व. गोपीनाथ मुंडे यांचा शनिवारी नववा स्मृतिदिन आहे. यानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही बीडमधील परळीच्या गोपीनाथ गडावर आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी गेल्या काही दिवसांपासून भाजपा सोडणार अशा सुरू असलेल्या चर्चांवर भाष्य केले. त्या म्हणाल्या की, 'राजकारणात जी काही भूमिका घेईल ती छातीठोकपणे घेईन.'

पंकजा मुंडे म्हणाल्या की, 'भूमिका समाजहिताच्या घ्यायच्या असतात. एखाद्या वेळेस सगळ्यांना आवडणाऱ्या भूमिका घेणारा व्यक्ती आमदारकी, खासदारकी किंवा मंत्रीपद मिळवू शकतो, पण तो कधी नेता होऊ शकत नाही. मला जर वेगळी भूमिका घ्यायची असेल तर अशीच तुम्हा सगळ्यांना याठिकाणी बोलवेल आणि तुमच्या समोर बिनधास्त भूमिका घेईन, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

# महिला बचतगटांची कामगिरी

## गतवर्षात ३१९ कोटींचा कर्जपुरवठा

सुराज्य/ठाणे

ग्रामीण परिसरातील महिलांनाही पारंपरिक शेती व्यवसायापलीकडे व्यवसाय करता यावा, यासाठी ठाणे जिल्ह्यातील महिला बचतगटांनी भरारी घेतल्याचे दिसून येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील १० हजार ८५४ बचतगटांमधील महिलांना गेल्या तीन वर्षांत ३१९ कोटींचा कर्जपुरवठा करण्यात आला आहे. तर, २०२२-२३मध्ये तीन हजार ७७८ बचतगटांना १४९ कोटी २८ लाख ६६ हजारांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. बचतगटांनी उत्पादित केलेला माल सातासमुद्रापार जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बचतगटांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचे सकारात्मक चित्र



पाहायला मिळत आहे.


ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, भिवंडी आणि शहापूर तालुका हा आदिवासी आणि दुर्गम परिसर म्हणून ओळखला जातो. मात्र जिल्ह्यातील या तीन तालुक्यांमध्येच सर्वाधिक बचतगट कार्यरत असून ते सर्वाधिक कर्ज घेऊन व्यवसाय करत असल्याचे दिसून येते. तर, ठाण्यातील अंबरनाथ, कल्याण, मुरबाड, भिवंडी आणि शहापूर अशा पाच तालुक्यांत ९७ बँक सखी कार्यरत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून दिले जाणारे कर्ज आणि बँक व्यवहार सुरळीत ठेवण्यासाठी बँक सखीची मदत मोलाची ठरत आहे.

### माथेरानमध्ये सहा माकडांचा तडफडून मृत्यू

**विषप्रयोगाचा संशय, स्थानिकांमधून हळहळ व्यक्त**

सुराज्य/माथेरान : मुंबई जवळचे पर्यटकांचे आकर्षण स्थळ म्हणजे माथेरान. सुट्टीच्या दिवसांमध्ये माथेरानमध्ये पर्यटकांची गर्दी होते. माथेरान आणि माकड हे एक समीकरणच आहे. माथेरानच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे माकडं. असे असताना माथेरानमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. शुक्रवारी सकाळी काही माकडांचा तडफडून मृत्यू झाला आहे.

माकडांचा तडफडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आल्यावर स्थानिकांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे. माथेरान रेल्वे स्टेशन परिसरात सकाळच्या दरम्यान सात ते आठ लहान मोठी माकडं बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. एकूण आठ माकडांपैकी दोन माकडं तडफडत होती. तर उर्वरीत सहा माकडं आधीच मृत्यूमुखी पडलेली होती.



# राज्यात लव्ह जिहाद प्रकरणांची संख्या मोठी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा दावा

सुराज्य/मुंबई

राज्यात लव्ह जिहाद प्रकरणांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राज्यातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींच्या तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात लव्ह जिहादची प्रकरणं उघडकीस आली आहेत. यामध्ये राज्यात हरवलेल्या तक्रारींच्या शोधण्याचे प्रमाण ९० ते ९५ टक्के इतके आहे.

काही प्रकरणांमध्ये खोटी आश्वासनं आणि ओळख दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे काही प्रकरणांमधून आढळून आले आहे. तसेच विवाहित पुरुषही महिलांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत होते. लव्ह जिहादची प्रकरणंही मोठ्या प्रमाणात समोर आली आहेत, असं फडणवीस म्हणाले.

लव्ह जिहादवर आम्ही कायदा आणण्याचा विचार करत आहोत. यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या विविध कायद्यांचा अभ्यास आम्ही करत आहोत. लव्ह जिहाद हा एक असा शब्द आहे की, तो (दक्षिणपंथी) कार्यकर्त्यांकडून वापरला जातो. मुस्लीम पुरुष लग्नाच्या बहाण्याने हिंदू स्त्रियांना इस्लाममध्ये धर्मांतरित करत असल्याचा आरोप त्यांच्याकडून केला जातो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रात लव्ह जिहादची एक लाखांपेक्षा जास्त प्रकरणं समोर आली आहेत, असं राज्याचे महिला बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी बुधवारी (८ मार्च) विधानसभेत सांगितलं. महाराष्ट्रात एक लाखांपेक्षा जास्त लव्ह जिहादची प्रकरणं समोर आल्याने कुठे ना कुठे समाज व्यथित आहे. लव्ह जिहाद आणि महिलांवरील अत्याचार या मुद्द्यांवर राज्यभरात मोठ्या संख्येने मोर्चे निघत आहेत.

राज्यात पुन्हा श्रद्धा वालकर हत्याकांड घडू नये, ही सरकारची जबाबदारी आहे', असं मंगल प्रभात लोढा म्हणाले होते.

# शांत रहा...महापालिका खड्डयात झोपलीयं!

## स्मार्ट सिटी की खड्ड्यांची सिटी : नागरिक वैतागले

## दुरुस्तीसाठी निविदा काढली; पण कामाला अद्याप मुहूर्त लागेना

सुराज्य/सोलापूर

कुठल्याची शहरातील रस्ते हे त्या शहराच्या रक्तवाहिन्या समजल्या जातात. त्यामुळे रस्ते सुस्थित आणि खड्डेमुक्त हवेत. तरच जनजीवन सुरळित राहणार आहे. नाहीतर नागरिकांची विविध आजार आणि अपघातातून सुटका नाही. चांगले आणि खड्डेमुक्त रस्त्यासाठी महापालिका सतर्क असणे तितकेच महत्वाचे आहे. केवळ आणि केवळ रस्त्यांसाठी महापालिका विविध माध्यमातून मिळणाऱ्या कोट्यवधींचा निधी खर्च करते. पण हा निधी रस्त्यावर खर्च करते की कागदावरच राहतो?, हा प्रश्न पडतो. फक्त खड्डे बुजवण्यासाठी झोनवाईज लाखों रुपयांचा निधी दिला जातो. पण त्याप्रमाणात रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी होताना दिसत नाही. आजवर अनेक सामाजिक संघटनांनी रस्त्यावरील खड्ड्यामध्ये वृक्षारोपण करुन गांधीगिरी केली. पण तरीची झोपी गेलेल्या महापालिकेला जाग येत नाही. त्यामुळेच 'शांत रहा... महापालिका खड्ड्यात झोपलियं', असे म्हणावे लागत आहे.





सोलापूर शहरातील अनेक भागातील बहुतांश रस्ते गॅस लाईन बसवणे, केबल टाकणे यासह विविध कारणांसाठी कामासाठी खोदण्यात आले आहेत. या खोदलेल्या रस्त्यामुळे सोलापूरकर चांगलेच वैतागले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे सोलापूर शहर स्मार्ट सिटी नाही तर खड्ड्यांची सिटी आहे, असे म्हणण्याची वेळ सोलापूरकरांवर आली आहे. पावसाळ्यापूर्वी महापालिकेने शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

गेल्या वर्षांपासून गॅसलाईन, रिलायन्स केबल, वोडाफोन, आयडीया आणि स्मार्ट सिटीअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे अशा विविध कामांकरिता रस्ते खोदाईचे काम सुरू आहे. महापालिकेने सोलापूर शहरातील कामांसाठी रस्ते खोदण्याची परवानगी विविध कंपन्यांना दिली मात्र खोदकाम झाल्यानंतर संबंधित कंपनीने रस्ते दुरुस्त केले नाहीत. याबदल्यात महापालिकेने संबंधित कंपनीकडून रस्ते खोदाईचे पैसे भरून घेतले. मात्र रस्ते पूर्ववत केले नाही. या खोदकामाप्रसंगी शहरातील अनेक ठिकाणचे ड्रेनेजलाईन फुटले, नळजोडणी तुटल्या आहेत. या तोडफोडीच्या दुरुस्तीवरून संबंधित कंपनी व महापालिका अधिकारी यांच्यामध्ये वादावादी सुरू होती. प्रशासनाकडे आम्ही नुकसानापोटी रक्कम भरपाई भरूनच परवानगी घेतली असे कंपनीचे म्हणणे आहे तर महापालिका अधिकारी केवळ रस्ता दुरुस्तीपोटीची रक्कम भरून घेण्यात आल्याचे सांगत होते. यामुळे शहरातील खड्डे रस्त्यावर तसेच राहिले ते बुजवण्यासाठी मनपाकडून कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. या प्रकारात मात्र नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला आणि सध्याही लागत आहे.

रस्त्यावरील असलेल्या खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले. महापालिकेच्या या कारभारामुळे शहरवासियांकडून रस्त्यांच्या दूरवस्था संदर्भात टीकेची झोड उठत आहे. नागरिकांचा संताप आणि विविध संघटना पक्षांच्या आंदोलनानंतर महापालिकेने गेल्या महिन्यात शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी दहा कोटींची निविदा काढली आह. मात्र अद्याप या कामाला मुहूर्त मिळालेला नाही. पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे नियोजन महापालिका करत आहे, असे अधिकारी सांगत आहेत. मात्र पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे अशा परिस्थितीत महापालिका रस्त्यावरील खड्डे कधी बुजवणार?, असा प्रश्न सोलापूरकरांना पडला आहे.

सोलापूर शहरात चार दिवसाआड सोलापूरकरांना पाणी मिळते. त्यामुळे रस्ते खोदाईमुळे अनेक सार्वजनिक व घरगुती नळाचे कनेक्शन तुटल्याने पाणी सुटलेल्या दिवशी रस्त्यावर पाणी होऊन माती चिखल असल्याने दुचाकी चालकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. अशा अनेक समस्यांना सोलापूरकर सामोरे जात आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासन या सर्व प्रश्नाकडे कधी लक्ष देणार आह?, असा संतापजनक सवाल महापालिका प्रशासन आणि स्मार्ट सिटीच्या संबंधित अधिकाऱ्यांना सोलापूरकर विचारत आहेत.

### या रस्त्यावर आहेत खड्डेच खड्डे

शहरात जुळे सोलापूर, होटगी रोड, ७० फूट रोड, दत्त चौक, रेल्वे स्टेशन परिसर, मधला मारुती, टिळक चौक, कोंतम चौक, समाचार चौक, विजापूर वेस, बाराईमाम चौक, बाळीवेस, मंगळवार बाजार, राजेंद्र चौक आदी परिसरात रस्त्यावर खड्डे आहेत. या खड्ड्यांमुळे चालकांना आपले वाहन सावकाश चालावे लागत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. सोलापूरमधील नागरिकांना याचा त्रास सहन करतच घर गाठावे लागत आहे.

### अपघाताला आमंत्रण

शहरातील प्रमुख रस्त्यांवर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य आहे. मुलाना शाळेत सोडण्यासाठी व भाजीपाला घेण्यासाठी सकाळी बाजारात दुचाकीवरुन जावे लागते. शहरातील रस्ते खोदून ठेवण्यात आल्याने अडचणीचा सामना करावा लागतो. याकडे मनपा प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. खड्ड्यातून गाडी नेताना अनेक वेळा अपघातही झाले आहेत असे शहरातील नागरिक दिनेश जाधव यांनी सांगितले.

### जीव मुठीत धरुन जावे लागते

शहरातील सर्व रस्ते खोदल्याने रस्त्यावरील अपघात आणि वाहतूक कोंडी ही नित्याची झाली आहे. त्यामुळे सकाळी प्रचंड वाहतुकीची कोंडी होते. सत्तर फूट येथील रोड तर संपूर्णपणे खड्ड्याचाच आहे. घरी जाताना जीव मुठीत घेऊन घरी जावे लागते. खड्ड्यातून वाहन चालवताना मणक्याचे आजारही उद्भवत आहेत याकडे महापालिका प्रशासन कधी लक्ष देणार असा सवाल युवक प्रसाद जोशी यांनी केला.

### खड्डे बुजवण्याचे काम लवकरच

शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. येत्या आठ ते दहा दिवसात खड्डे बुजवण्याचे कामे सुरू होतील असे नगर अभियंता लक्ष्मण चलवादी यांनी सांगितले.

---



## अक्कलकोट शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी रईस टिनवाला

सुराज्य/अक

अक्कलकोट शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी रईस टिनवाला यांची निवड करण्यात आली.त्यांचे निवडीचे पत्र सोलापूर येथे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते देऊन त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

रईस टिनवाला यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्षा आमदार प्रणिती शिंदे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हा अध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, जेष्ठ नगरसेवक बाबा मिस्त्री, मल्लिकार्जुन पाटील आदींनी अभिनंदन केले.यावेळी अभय खोबरे, सद्दाम शेरिकर, मो.निसार तांबोळी, चंदन अडवीतोटे,जावेद फुलारी, सुनील खवळे, लाला राठोड, शिवराज स्वामी, नितिन ननवरे, बाबासाहेब पाटील, मुबारक कोरबु, काशनाथ गोळळे, ओईस टिनवाला, इम्रान मुकादम, शिवराज स्वामी, अल्लिबाशा अत्तार, मतीन पटेल, महादेव चुंगी, विनीत पाटील, अतीक अरब, शाहबाज यलसंगी, शबाब शेख, मैनुद्दीन कोरबू, नितिन राठोड, वसीम बागवान, अयाज चंदनवाले, मैनुद्दीन शेख, सर्फराज शेख, बालाजी शापवाले, जब्बार बागवान, अहमद शिलेदार यांच्यासह रईस टिनवाला यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालखी सोहळ्यातील पाणीपुरवठ्याची तपासणी करा : गुरव

सुराज्य/सोलापूर

श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज तसेच अन्य संताच्या पालख्याबरोबर आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूरात मोठ्या संख्येने वारकरी, भाविक येतात. पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या भाविकांना पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहरात व परिसरात स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी मिळावे यासाठी पालखी मार्गावरील तसेच शहरातील पाणीपुवठा करणाऱ्या जल स्त्रोतांची तपासणी करावी अशा सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या.

आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्ग तसेच शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थापनाबाबत प्रांत कार्यालयात पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, महावितरणचे कार्यकारी अभियंता बी.ए.भोळे तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. पंढरपूर तालुक्यात पालखी मार्गावर ७१९ जलस्त्रोत व टॅकर भरण्यासाठी १२ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच आषाढी यात्रा कालावधीसाठी मुबलक पाणी पुरवठा यासाठी पंढरपूर शहर व परिसरात ३६ बोअरवेल, ५० हातपंप, टॅकर भरण्यासाठी दोन ठिकाणे व ६५ एकर येथील पाणीपुरवठा व्यवस्था नगरपालिकेच्या वतीने करण्यात आली आहे. यासर्व ठिकाणच्या जलस्त्रोतांची तपासणी करावी तसेच ज्या ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य अशा ठिकाणी ठळक माहिती फलक लावावेत. पालखी मार्गावरील टँकर भरण्याच्या ठिकाणी कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यक



ठिकाणी रस्ता दुरुस्ती करावी. महावितरण विभागाने पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या स्त्रोतांचा विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही यांची दक्षता घ्यावी. पाण्यात क्लोरिनचे योग्य प्रमाण राहिल याची दक्षता आरोग्य विभागाने घ्यावी, अशा सूचना प्रांताधिकारी गुरव दिल्या. तसेच वारी कालावधी पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरना वाहतुकीस अडथळा येणार नाही याबाबत वाहतुक नियोजन करावे. पाटबंधारे विभागाने वारी कालावधी नदीपात्रात पाणी सोडण्याबाबत नियोजन करावे अशा सूचनाही प्रांताधिकारीगुरव यांनी यावेळी दिल्या. यावेळी आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना तसेच शहरातील नागरिकांना स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी नगरपालिकेकडून आवश्यक नियोजन करण्यात आले असल्याचे मुख्यधिकारी अरविंद माळी यांनी यावेळी सांगितले.

## अक्कलकोट शहर व तालुक्यात कारहुणवी सण उत्साहात साजरा

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहर व तालुक्यात कारहुणवी सण उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यात एकाच टप्प्यात कारहुणवी सण साजरा न होता त्या-त्या गावच्या वेशीच्या दिशावरून कारहुणवी सण साजरा करण्यात येतो. तालुक्यात प्रसिद्ध कारहुणवी सण म्हणून सलगर, नागणसुर, चप्पळगांव आदी गावात साजरा करण्यात येतो. परंतु यंदा सलगर गावात कारहुणवी सण हा दि ५ जून रोजी साजरा करण्यात येणार आहे.तर नागणसुर कारहुणवी



सणाला मात्र शनिवारपासूनच प्रारंभ झाला आहे.पुढे बैलांची संख्या पाहून नागणसुर मध्ये आठवडाभर बैलगाडा शर्यत व कारहुणवी सण साजरा करण्यात येतो.

सतत वर्षभर काळ्या आईची सेवा करणार्या बळीराजाचा सण म्हणून या सणाकडे पाहिले जाते.घरातील बैलजोड्यांना अथवा अन्य पशूंना आज कारहुणवी सणाचे औचित्य साधून बहुमान देताना शेतकरी दिसून आला. शेतकरी बैलांच्या शिंगांना रंग लावणे, रंगीबेरंगी सजावट, घागर माळे, मटाट्या, मोरकी आदी आभूषणे घालून सजवल्यावर शेतकरी पशुधनाची सहकुटुंब पूजा करताना दिसून आला. नंतर सायंकाळी गावातील प्रमुख रस्त्यावरुन सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या सणानिमित्त पशुपालक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने बैलांची शर्यत, बैलांची मिरवणूक पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. अक्कलकोट तालुक्यातील श्रीक्षेत्र श्रीमंतलिंग पत्रीबन मल्लिनाथ देवस्थान किणी येथे कारहूणवी सणानिमित्त बैलांची पूजा सदगुरु हवा मल्लिनाथ महाराज आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आली.

## बुबणे चाळीत नवरात्र महोत्सवाचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

बुबणे चाळ भैया चौक यांच्या वतीने सालावादाप्रमाणे यंदाही नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महोत्सवाचे भीमाप्पा तेलकोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शुक्रवार दिनांक ९ रोजी८ सकाळी ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत कुमारी, सौभाग्यवती महिला, व देवी आदिना बांगड्या भरण्याचा कार्यक्रम होणार आहे. यात सुमारे एक हजार महिलांचा सहभाग राहणार आहे. शनिवार १० रोजी सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत हेमंत कुमार यांचा भावगीत, भक्तीगीतांचा कार्यक्रम, रविवार ११ रोजी सायंकाळी चार ते दहा वाजेपर्यंत जलकुंभ मिरवणूक निघणार आहे. सोमवार दिनांक १२ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत रुद्र पठणाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १ ते सायंकाळी ८ पर्यंत मंगल महारथी होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळवार दिनांक १३ रोजी सकाळी ८ ते दुपारी १२वाजेपर्यंत होम अहवल सायंकाळी आठ पर्यंत मंगल महारथी होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.. बुधवारी १४ रोजी सायंकाळी ५ ते१० वाजेपर्यंत प्रसिद्ध कर्नाटक येथील बी हेमंत कुमार यांचे जाणतरंग भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

---

## दहावीतील गुणवंत

### यंदाही निकालात मुलींची बाजी





अमृता शिंपी
९७.००%
इंडियन मॉडेल स्कूल



श्रेया गायकवाड
९४.४०%
चंडक इंग्लिश स्कूल



श्वेता लोमटे
९२.४०%
लोहारा हायस्कूल



हर्षाली सुरवसे
८९.००%
लिटल फ्लॉवर स्कूल



आसावरी गोडसे
८८.८०%
इंडियन मॉडेल स्कूल



समृद्धी घोडके
८७.००%
इंडियन मॉडेल स्कूल



वैष्णवी जवळेकर
७७.४०%
भारती विद्यापीठ



मनोहरी सारसांबी
९६.६०%
इंडियन मॉडेल स्कूल



मनोज जिरगे
७२.२०%
विद्या इंग्लिश स्कूल



मयूरी पुजारी
७६.२०%
सिध्देश्वर प्रशाला



प्राजक्ता रोकडे
७६.००%
ठोकळ प्रशाला



अलोक गीडवीर
७९.००%
अरिहंत इंग्लिश स्कूल



महेश निंबर्गी
६७.००%
ठोकळ प्रशाला



पौर्णिमा पुजारी
६६.८०%
सिध्देश्वर प्रशाला